## प्रकरण चौथे

# गडहिंग्लज साखर कारखान्याचे राजकारण

## प्रकरण चौथे

### गडहिंग्लज साखर कारखान्याचे राजकारण

महाराष्ट्राच्या राजकारणात सहकारी चळवळीने मोलाची भूमिका बजावलेली आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील सत्तेची विविध केंद्रे आपल्या ताब्यात ठेवण्यात सहकारी संस्थांचे पुढारी यशस्वी झालेले आहेत. म्हणून ग्रामीण भागात सहकारी संस्था या राजकीय सत्तेच्या शक्तिस्त्रोत समजल्या जातात. आज महाराष्ट्राचे राजकारण तीन आखाडयात खेळले जाते. त्यातील पहिला आखाडा राज्यस्तरावरचे राजकारण हा आहे. दुसरा आखाडा पंचायत राज्य संस्थांचे राजकारण हा आहे आणि तिसरा आखाडा सहकारी संस्थांचे राजकारण हा आहे. सहकारी संस्थांमध्ये साखर कारखान्यांचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. कारण सत्तेच्या राजकारणासाठी आवश्यक असणारी साधनसामुग्री आणि लोकांचा पाठिंबा साखर कारखान्यांच्या मदतीने मिळविता येतो.

### सहकारी साखर कारखाना आणि स्थानिक राजकारण

राजकारणाचा विचार करता सर्व सहकारी संस्थांमध्ये सहकारी साखर कारखाने सर्वात महत्वाचे आहेत. कारण साखर कारखाने राजकीय सत्तेची केंद्रे आहेत. कारखान्यांच्या संचालक मंडळाच्या हातात मोठया प्रमाणात साधनसामग्री असते. त्या साधनांचा उपयोग विधानसभा निवडणुकीत केला जातो. त्यामुळे साखर कारखान्यांचा कारभार सहसा एका टोळक्याच्या हातात असतो आणि वर्षानुवर्षे आपल्या समर्थकांना खूष ठेवीत हे टोळके सत्ता आपल्या हातात ठेवते. बाहेरचे पुढारी सत्ताधाऱ्यांना

सहसा पदच्युत करू शकत नाहीत. महाराष्ट्रात दररोज पाच हजार टनांच्यावर गाळप क्षमता असणारे चार कारखाने आहेत. ते म्हणजे इचलकरंजीचा पंचगंगा सहकारी साखर कारखाना, रेठऱ्याचा कृष्णा सहकारी साखर कारखाना, सांगलीचा शेतकरी सहकारी साखर कारखाना आणि प्रवरानगरचा साखर कारखाना हे होत.

साखर कारखान्याचा भोवतालचा प्रदेश आज साखर सम्राटांच्या प्रभावाखाली आहे. साखर कारखान्याबरोबरच आता दूध योजना, कुक्कुट पालन योजना, कागद निर्माण, मद्य निर्मिती, ॲसिटोनची निर्मिती हे व इतर अनेक उद्योग सुरु झाले आहेत. साखर कारखान्यांनी स्वत:च्या शाळा, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये सुरु केली. बहुतेकांनी वसंतदादा पाटील यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात विना अनुदान इंजिनिअरिंग महाविद्यालये सुरु केली. साखर कारखान्यांच्या अध्यक्षांनी विना परतीच्या ठेवी आणि शेतकऱ्यांच्या ऊसबिलात नाना प्रकारे कपात करत बराच पैसा गोळा केला आणि तो त्यांनी खाजगी ट्रस्टमध्ये जमा केला. यातील काही ट्रस्ट खाजगी मालकीचे होते व काही अध्यक्ष या ट्रस्टचे तहहयात अध्यक्ष होते.

प्रत्येक साखर कारखान्याच्या अध्यक्षास आमदार, खासदार किंवा मंत्री व्हावयाचे असते. किंवा प्रत्येक आमदार खासदार व मंत्री आपला स्वत:चा असा कारखाना स्थापन करण्याची इच्छा बाळगून असतो. ज्या उमेदवाराच्या पाठीमागे साखर कारखान्याचे बळ असते तो सहसा विधान सभेसाठी किंवा लोकसभेसाठी निवडून येतो. कधी कधी लोकांचा त्यांच्यावर राग असला तर मात्र हे उमेदवार पराभूत होतात. रत्नाप्पा कुंभार,

शंकरराव मोहिते, पी.के. पाटील, राजारामबापू पाटील, विष्णुपंत पाटील, प्रकाशबापू पाटील, महादेव महाडिक, अनिल बाबर, नरसिंग गुरुनाथ पाटील, विक्रमसिंग घाटगे, निपुण कोरे यांच्यासारखे मोठे कारखानदार पराभूत झालेले आहेत. तर विरोधी पक्षातील नागनाथ नायकवडी, गोविंदराव कालिकते, तसेच कॉंग्रेस (आय) चे बाबासाहेब कुपेकर यांनीही साखर कारखाना हातात येताच विधानसभा निवडणुका जिंकलेल्या आहेत. म्हणूनच पश्चिम महाराष्ट्रात, विशेषत: दक्षिण महाराष्ट्रात प्रत्येक महत्वाकांक्षी राजकीय पुढारी साखर कारखाना काढण्याची उमेद बाळगतो. कल्लाप्पा आवाडे यांच्यासारख्या प्रस्थापित पुढाऱ्यांनी साखर कारखाना काढला आहे. शालिनीताई पाटील याही आज सहकारी साखर कारखाना काढीत आहेत. कारण राजकारणात स्थिर होण्यासाठी व लोकांचा पाठिंबा सातत्याने मिळविण्यासाठी साखर कारखान्यासारखे दुसरे चांगले साधन नाही, हे त्यांच्या लक्षात आलेले आहे. [१]

## महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याचा विकास

महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांची मुहूर्तमेढ स्वातंत्र्योत्तर काळात रोवली गेली. साधारणपणे ७०-७५ वर्षांपूर्वी ह्या उद्योगास प्रारंभ झाला. १९२० मध्ये प्रवरानदीवर भंडारदरा येथे धरण बांधल्यानंतर अहमदनगर व नाशिक ह्या जिल्ह्यांत उसाची लागवड होऊ लागली. नंतर अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूरजवळ हरेगाव येथे साखरेचा एक कारखाना सुरु झाला. त्यानंतर महाराष्ट्रात साखर कारखान्यांचा विकास होत गेला. परंतु महाराष्ट्रात साखर उद्योगास खरी सुरवात १९५० नंतर झाली. कारण १९५० पर्यंत महाराष्ट्रातील सर्व साखर

कारखाने खाजगी मालकीचे होते. १९५० मध्ये श्रीरामपूर जवळील प्रवरानगर येथे सहकारी तत्वावर सहकारी साखर कारखाना सुरु झाला. हा कारखाना पद्मश्री विखे-पाटील यांनी सुरु केला. त्यानंतर महाराष्ट्रात साखर उद्योगाची जलद गतीने प्रगती झाली.

आज महाराष्ट्रात १३८ साखर कारखाने आहेत. सध्या महाराष्ट्राचा साखर उत्पादनात भारतात दुसरा क्रमांक असून देशाच्या २७ टक्के साखरेचे उत्पादन एकट्या महाराष्ट्रातून निघते. त्यासाठी राज्यातील जमीन क्षेत्रापैकी जवळ जवळ १०.२४ लाख हेक्टर जमीन ऊसाखाली आलेली आहे. महाराष्ट्रातील विशेषत: पश्चिम भागात साखर उद्योगाचा अधिक विकास झालेला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर, नाशिक, पुणे, सातारा, सोलापूर, सांगली व कोल्हापूर या जिल्हयात साखर उद्योगाची प्रगती झालेली आहे. यापैकी अहमदनगर व कोल्हापूर हे दोन जिल्हे साखर उद्योगाच्यादृष्टीने विशेष महत्वाचे आहेत. अहमदनगर जिल्हयाचा साखर उत्पादनात महाराष्ट्रात पहिला क्रमांक आहे. राज्याच्या ४१ टक्के व देशाच्या १० टक्के साखरेचे उत्पादन येथून निघते. या जिल्हयात एकूण १५ कारखाने आहेत. सांगली जिल्हयात ९, पुणे जिल्हयात ७, सातारा जिल्हयात ८, साखर कारखाने आहेत.

**<u>कोल्हापूर जिल्हयातील साखर कारखान्याचा विकास</u>**

साखर उत्पादनात कोल्हापूर जिल्हयाचा महाराष्ट्रात दुसरा क्रमांक आहे. या जिल्हयात एकूण १३ साखर कारखाने आहेत. कोल्हापूर जिल्हयात कसबा बावडा, शाहूनगर (परिते), कुडित्रे, बिद्री (मौनीनगर), गंगानगर (इचलकरंजी), वारणानगर, शिरोळ (दत्तनगर), कागल, हलकर्णी,

आसुर्ले पोर्ले, गडहिंग्लज, हुपरी, आजरा येथे साखरेचे कारखाने आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात पंचगंगेच्या खो-यात ऊसाची मोठया प्रमाणात लागवड होते. शिवाय वाहतुकीच्या सोयी आणि मजूर उपलब्ध असल्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात साखर उद्योगाचा विकास झालेला आहे.[२]

## गडहिंग्लज सहकारी साखर कारखान्याची स्थापना व इतिहास

महाराष्ट्राच्या राजकारणात सहकारी साखर कारखान्यांना फार महत्वाचे स्थान आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात सहकारी साखर कारखान्यांनी आपला फार मोठा प्रभाव निर्माण केलेला आहे. सहकारी साखर कारखाना स्थापन होताच अनेक साधने निर्माण होतात. लोकांना आपल्या प्रभावाखाली, नेतृत्वाखाली ठेवता येते. सहकारी साखर कारखान्यामुळे ग्रामीण भागात मोठया प्रमाणात संपत्ती आणि रोजगार निर्माण होत असल्यामुळे अशा संस्था आपल्या प्रभावाखाली असाव्यात यासाठी राजकीय पक्ष प्रयत्नशील असतात. साखर कारखान्यामुळे पाठीराख्यांची साखळी निर्माण होते. म्हणून माजी आमदार आणि गडहिंग्लज तालुक्यातील नेते पी.आर. उर्फ आप्पासाहेब नलवडे यांनी गडहिंग्लज तालुका सहकारी साखर कारखाना स्थापन करुन गडहिंग्लज तालुक्याची विकासाची मुहूर्तमेढ रोवली.

गडहिंग्लज जवळील हरळी येथील माळावरची जागा कारखान्यासाठी १९७६ साली निश्चित करण्यात आली आणि साखर कारखाना उभारणी प्रक्रियेला श्री. आप्पासाहेब नलवडे यांच्या नेतृत्वाखाली सुरवात झाली. गडहिंग्लज तालुक्यातील शेतक-यांच्या मालकीचा सहकारी साखर कारखाना असावा ही पुष्कळ वर्षांची निकडीची गरज पूर्णत्वास गेली. गडहिंग्लज

तालुक्यातील जनतेने अपेक्षिलेले कारखान्याचे स्वप्न साकार झाले. शेअर्स गोळा करताना काही लोकांनी शेतकऱ्यांच्या मनामध्ये कारखाना होईल की नाही असा संभ्रम निर्माण करुन कारखान्याच्या उभारणीमध्ये अडचणी निर्माण केल्या होत्या. वास्तविक पाहता तालुक्यातील शेतकरी व सुशिक्षित बेकार यांचे जीवनमान सुखी व समृध्द होण्यासाठी साखर कारखान्याची अत्यंतिक गरज होती आणि साखर कारखान्याखेरीज तालुक्याच्या विकासास गती मिळणार नाही म्हणून श्री. आप्पासाहेब नलवडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अविरत कष्टाने साखर कारखाना उभा केला. गडहिंग्लजला साखर कारखाना होणार, यावर कुणाचा विश्वास नव्हता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि अडचणींना सामोरे जाऊन मोठ्या जिद्दीने कारखान्याची उभारणी केली. अतिशय कमी खर्चात आणि अतिशय अल्पवेळात कारखाना उभा केला. तसा विचार केला तर आजपर्यंतच्या साखर कारखाना उभारणीच्या इतिहासात हा एक आदर्श मानला जातो.

ग्रामीण भागाचा आर्थिक विकास करण्याच्या दृष्टीने शेतीवर अवलंबून असणारे उद्योगधंदे काढण्याचे ठरवून या देशात कृषी औद्योगिक धोरणाचा अवलंब करण्यात आला. त्यामध्ये सहकारी साखर कारखाने प्रामुख्याने वाटचाल करीत असून ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू म्हणून त्यांचेकडे पाहिले जाते. सहकारी साखर कारखान्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास बरीच मदत होत आहे.

गडहिंग्लज साखर कारखान्याचा यंत्रसामुग्रीचा पुरवठा व त्याची उभारणी करणेच्या कामी मेसर्स नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑप लि. पुणे, त्रिवेणी इंजिनिअरींग अलाहाबाद, रावळगाव शुगर वर्क्स, टेक्समॅको

लि. कलकत्ता, बकाउलफ, पुणे या कंपन्याकडून चांगले सहकार्य मिळाले. म्हणूनच अल्पकाळात कारखान्याची उभारणी होऊ शकली. हरळीच्या माळावर डौलाने उभा असलेला गडहिंग्लज तालुका सहकारी साखर कारखाना अनंत अडचणीवर मात करीत या कारखान्याची वाटचाल मोठया दिमाखाने पुढे चालू आहे.

## प्रथम गळीत चाचणी हंगामाचा शुभारंभ

मशिनरीची उभारणी द्रुतगतीने करून १९७८-७९ या सालांत चाचणी घेण्याच्या संकल्पाप्रमाणे त्याचप्रमाणे उभारणीच्या कामात आलेल्या अनंत अडचणीवर परिश्रमपूर्वक मार्ग काढून कारखान्याची उभारणी पूर्ण केली. दि. ३ मे, १९७९ रोजी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री मा. शरद पवार यांच्या शुभ हस्ते चाचणी गळीतास सुरूवात केली. गळीत हंगामाच्या शुभारंभाप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार मंत्री प्रा. एन्.डी. पाटील व कोल्हापूर जिल्हयाचे माजी पालकमंत्री श्रीपतराव बोंद्रे उपस्थित होते. तालुक्याच्या विकासाचे चालू झालेले चक्र पाहून कोणीही समाधान व्यक्त करील असाच तो प्रसंग होता. प्रथम गळीत हंगामात १५२० मे. टन उसाचे गाळप झाले व ११३८ साखर पोती उत्पादन झाली.

## संचालक मंडळ व सरकार नियुक्त समिती

गडहिंग्लज साखर कारखाना उभारणीच्या सुरवातीच्या काळात २५/४/१९७९ पर्यंत पुढील संचालक मंडळाने कामकाज पाहिले.

प्रथम संचालक मंडळ

| अ.नं. | संचालकाचे नांव | संचालकाचे पद |
|---|---|---|
| १) | श्री. पी.आर. उर्फ आप्पासाहेब नलवडे | चेअरमन |
| २) | श्री. एस्.डी. उर्फ काकासो शहापूरकर | व्हाईस चेअरमन |
| ३) | श्री. ग.बा. देसाई | संचालक |
| ४) | " अ.मु. तेलवेकर | -"- |
| ५) | " ना.गु. बटकडली | -"- |
| ६) | " ग.वि. हरळीकर | -"- |
| ७) | डॉ. अ.बा. गुणे | -"- |
| ८) | श्री. ई.शि. गोखले | -"- |
| ९) | " ना.वा. सामानगडकर | -"- |
| १०) | " धों.बा. पताडे | -"- |
| ११) | " एम्.के. सावंत | कार्यकारी संचालक |

वरील संचालक मंडळाची मुदत माहे एप्रिल, १९७९ मध्ये संपणार होती, व त्यावेळी कारखाना उभारणीचे काम अतिशय गतिमान होते व ते पूर्ण करून चाचणी हंगाम घ्यावयाचा होता म्हणून एप्रिल व मे महिना कारखान्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा होता. या काळात निवडणूक कार्यक्रमाने कारखान्याच्या चालू कामाची गती कमी येईल व चाचणी हंगाम पुढे जाईल या भीतीने प्रथम चाचणी घेईतोपर्यंत कारखान्याची निवडणूक पुढे ढकलावी असा वार्षिक सभेने एकमताने ठराव संमत केला. जनरल सभेच्या आदेशाप्रमाणे निवडणूका पुढे ढकलण्यासंबंधी कारखान्याने महाराष्ट्र शासनास विनंती केली. शासनाने संचालक मंडळाची निवडणूक पुढे ढकलली. पण पूर्वीचे सर्व संचालक मंडळ अधिकारावर न ठेवता त्या ठिकाणी बदल करून पुटील सदस्यांची समिती शासनाने नेमली.

सरकार नियुक्त समिती

| अ.नं. | सदस्याचे नांव | हुद्दा |
| --- | --- | --- |
| १) | श्री. पी.आर. उर्फ आप्पासाहेब नलवडे | चेअरमन |
| २) | श्री. ग.बा. देसाई | सदस्य |
| ३) | श्री. धों. वा. पताडे | -"- |

वास्तविक कारखान्याच्या हिताच्या दृष्टीने पूर्वीच्या सर्व संचालकांची समिती करणे योग्य होते. पण शासनाने कोणत्या हेतूने बदल केला हे समजत नाही.

**साखर कारखाना कार्यक्षेत्र**

गडहिंग्लज साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात संपूर्ण गडहिंग्लज तालुका अपेक्षिलेला आहे. पण नेसरी भागातील १८ गांवे पूर्वीच हलकर्णीच्या दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याला जोडलेली आहेत. नेसरी भागातील गांवे गडहिंग्लज तालुक्यातील असून साखर कारखान्यापासून ७ मैल अंतरावर आहेत. त्यामुळे ही गावे कारखान्याच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट होणे योग्य व न्याय आहे. तसेच कारखान्यापासून तीन-चार मैलावरच आजरा तालुक्याची सीमा लागत असून आजरा तालुक्यातील १० ते १५ मैलाचा अंतरावरील ५६ गांवे गडहिंग्लज कारखान्याच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट होणे जरूर आहे. वरील गावाचा कारखान्याच्या कार्यक्षेत्रात समावेश झाला तर जरूर त्या प्रमाणात कारखान्यास उसाचा पुरवठा होईल.

तथापि आजरा तालुक्यातील मागणी केलेल्या ५६ गांवापैकी केवळ १२ गावांचा व नेसरी भागातील गांवांचा गडहिंग्लज कारखान्याच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र शासनाच्या दि. १२.९.१९८४ च्या आदेशान्वये समावेश केला आहे.

साखर कारखाना प्रकल्पासाठी एकूण २०० ते २५० एकर जमिनीची गरज असते. परंतु एवढी जमीन कारखान्यास न मिळता सरकार मालकीची हरळी खुर्द येथील ६५ एकर जमीन ताब्यात मिळाली व कारखाना प्रकल्प फक्त उभा केला. याशिवाय कारखान्यास आवश्यक अशी सभोवतालची हरळी खुर्द व हरळी बुद्रुक गांवातील ८५ एकर जमीन खाजगी मालकीची असून सदरची जमीन वाटाघाटीने कारखान्यास मिळाली नाही म्हणून लँड अँक्विझिशनचे प्रकरण पाठविले. [३]

गडहिंग्लज साखर कारखाना स्थापने पाठीमागचा उद्देश (हेतू)

१) साखर कारखान्याच्या माध्यमातून तालुक्याचा सर्वांगीण विकास साधणे हा मुख्य उद्देश होता.

२) साखर कारखाना हा ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू आहे. गडहिंग्लज तालुक्यातील जनतेचे राहणीमान उंचावून त्यांचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास साधणे.

३) तालुक्यातील लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे.

४) साखर कारखान्याच्या माध्यमातून आर्थिक गंगा तालुक्यातील शेतकऱ्याच्या दारापर्यंत आणून सोडणे व प्रत्येकाने आपल्या कुवतीप्रमाणे त्याचा लाभ घ्यावा व आपली उन्नती साधावी हा हेतू होता.

५) शेतीपूरक उद्योगधंद्याचा विकास साधणे.

या उद्दिष्टांची पूर्तता करण्याच्या हेतूने श्री. आप्पासाहेब नलवडे यांनी अथक प्रयत्न केले. संपूर्ण महाराष्ट्रात सहकाराची गंगा वहात असताना व सहकारी चळवळीला विशेष प्रोत्साहन मिळत असताना गडहिंग्लज तालुक्यात सहकारी तत्वावर कारखाना नाही याची उणीव भासत होती. गडहिंग्लज तालुक्यात साखर कारखाना असणे अत्यंत गरजेचे होते. साखर कारखान्याच्या माध्यमातून तालुक्याचा विकास साधणे हे श्री. आप्पासाहेब नलवडे व जनतेचे स्वप्न होते. ते साकार झाले.[४] आतापर्यंत पुढील व्यक्तींनी गडहिंग्लज सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्षपद भूषविले.

| अ.नं. | कारखाना अध्यक्षाचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| १) | श्री.अँड.पी.आर. उर्फ आप्पासाहेब नलवडे | नोव्हेंबर १९७६ ते नोव्हेंबर १९८८ |
| २) | डॉ. शरदचंद्र श्रीपाद शहापूरकर | नोव्हेंबर, १९८८ ते जून, १९९० |
| ३) | श्री.अँड.श्रीपतराव दिनकरराव शिंदे | २२ ऑक्टोबर,१९९० ते नोव्हेंबर, १९९३ |
| ४) | श्री. पी.आर. उर्फ आप्पासाहेब नलवडे | ४ डिसेंबर,१९९३ ते जुलै, १९९५ |
| ५) | डॉ. प्रकाश श्रीपाद शहापूरकर | ऑगस्ट, १९९५ |

गडहिंग्लज साखर कारखाना निवडणूक इ.स. १९८१

साखर कारखान्याच्या माध्यमातून तालुक्याचा विकास साधणे हे श्री. आप्पासाहेब नलवडे यांचे ध्येय होते. कारखाना उभा करीत असताना त्यांचा अधिक पुढाकार होता. सकाळी सात पासून ते रात्री आठ पर्यंत राबत. मोठ्या जिद्दीने आणि चिकाटीने या तालुक्याच्या विकासाचा भाग्यविधाता साखर कारखाना उभा करुन एका दृष्टीने श्री. आप्पासाहेब नलवडे यांनी या तालुक्याच्या विकासात महत्वाची भर घातली.

२० एप्रिल, १९८१ रोजी गडहिंग्लज सहकारी साखर कारखान्याची निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत आप्पासाहेब नलवडे यांच्या नेतृत्वाखाली नलवडे पॅनेल, श्री. नागाप्पाण्णा बटकडली यांचे बटकडली यांचे बटकडली पॅनेल व शिवयोगी मोळदी यांचे शेतकरी पॅनेल असे तीन पॅनेल निवडणूक रिंगणात होते. व्यक्ती गटातील १० जागासाठी २९ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. नलवडे गटातील १०, बटकडली गटात १० व शेतकरी पॅनेलचे ९ असे उमेदवार होते. संस्थागटातील एका जागेसाठी निवडणूक दुरंगी होती. या निवडणुकीत कारखान्याचे संस्थापक चेअरमन श्री. आप्पासाहेब नलवडे यांच्याबरोबर प्रथमपासून असणारी डॉ. ए.बी. गुणे, श्री. नागाप्पाण्णा बटकडली, श्री. नानासाहेब सामानगडकर इत्यादी मंडळी श्री. आप्पासाहेब नलवडे यांच्या विरोधात उभी होती. या निवडणुकीत श्री. आप्पासाहेब नलवडे यांनी जनता पक्षाशी युती केली होती. यावेळी विरोधकांनी श्री. आप्पासाहेब नलवडे यांच्यावर टीकेचा भडीमार केला. जनता पक्षाशी कारखाना निवडणुकीत युती म्हणजे हा संधी-साधूपणा आहे. परंतु आप्पासाहेब नलवडे यांचे असे मत होते की, कारखान्यात पक्षीय राजकारण असणे योग्य नाही. शेतकऱ्यांच्या आर्थिक

विकासाची बाब असल्यामुळे कारखाना राजकारणापासून मुक्त असला पाहिजे. जनता पक्षाशी असलेल्या निवडणूक समझोत्याचा राजकारणाशी कोणत्याच प्रकारचा संबंध नाही.

या निवडणुकीच्या निमित्ताने श्री. आप्पासाहेब नलवडे यांनी आपल्या पॅनेलच्या सर्व सदस्यासह संपूर्ण तालुका प्रचार दौरा केला. तालुक्याचा विकास साधणे हे माझे स्वप्न आहे. त्यात तालुक्याचा शेती विकास आणि त्यासाठी पाणीपुरवठा, शेतकऱ्याना जोडधंदे, औद्योगिक आणि शैक्षणिक विकास इ. बाबत विविध योजना कारखान्याच्या माध्यमातून पूर्ण करावयाच्या आहेत असे त्यांनी स्पष्ट केले. विशेष म्हणजे श्री. आप्पासाहेब नलवडे चेअरमन असताना साखर कारखान्याची कोणतीच यंत्रणा निवडणूक कार्यात वापरली नाही.

गडहिंग्लज साखर कारखान्याच्या निवडणुकीसाठी २० एप्रिल, १९८१ रोजी मतदान झाले. ही निवडणूक साखर कारखान्याच्या संचालक पदाच्या ११ जागासाठी अत्यंत चुरशीची झाली. या निवडणुकीसाठी ४५०३ मतदार होते. त्यापैकी ३८०० मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजाविला. या निवडणुकीचा निकाल खालीलप्रमाणे —

गडहिंग्लज साखर कारखाना निवडणूक सन १९८१ - निकाल तक्ता

तालिका

एकूण मतदार - ४,५०३

झालेले मतदान - ३,८००

संस्था मतदार - ३०

| अ.नं. | विजयी उमेदवाराचे नांव | मिळालेली मते |
|---|---|---|
| | व्यक्ती गट | |
| १) | श्री. आप्पासाहेब उर्फ पी.आर. नलवडे | २,१४२ |
| २) | " गणपतराव बाळोजीराव देसाई | १,९५६ |
| ३) | " शंकरराव मेंडुले | १,८२८ |
| ४) | " दिनकरराव शिंदे | १,७७२ |
| ५) | " बापूसाहेब उर्फ व्यंकटेश विश्वनाथ फडणीस | १,९७२ |
| ६) | " विस्र्वासा शिरकोळे | १,९३१ |
| ७) | " गणेश विष्णू हरळीकर | २,००५ |
| ८) | " शंकरराव बाबूराव चव्हाण | २,०४७ |
| ९) | " शिवाजी देवाजी जाधव | १,८३६ |
| १०) | " रणजित देसाई | |
| | संस्था गट | |
| ११) | ॲड. दत्तात्रय हणमंत मगदूम | १६ |

वरील निवडणुकीत कारखान्याचे संस्थापक व चेअरमन आप्पासाहेब उर्फ पी.आर. नलवडे यांच्या पॅनेलचे सर्व उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून आले. या निवडणुकीत बटकडली पॅनेल व शेतकरी पॅनेलचा एकही उमेदवार निवडून आला नाही. [५]

महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण देशात सहकारी तत्वावर साखर कारखानदारी काढण्याचे मुख्य उद्देश प्रामुख्याने खालीलप्रमाणे सांगण्यात येतात.

१) उत्पादक शेतकरी, साखर कामगार व ग्राहक जनता या सर्व घटकांची व्यापाऱ्याकडून होणारी लुबाडणूक थांबविणे.

२) ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करुन देण्याबरोबरच ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांची व साखर निर्माण करणाऱ्या कामगारांची खाजगी साखर कारखानदारांकडून होणारी नागवणूक थांबविणे.

३) ग्रामीण विकासाबरोबरच ऊस उत्पादक व साखर कामगारांचा साखर कारखान्याच्या व्यवस्थापनातील लोकशाही सहभाग वाढविणे, इत्यादी उद्देश सहकारी साखर कारखानदारी सुरु करण्यामागे व तिला प्रोत्साहन देण्यामागे होते. परंतु याशिवाय सहकारी साखर साखर कारखानदारीमधील दुसरा सुप्त पण अतिशय महत्वाचा हेतू हा राजकीय स्वरुपाचा होता असे दिसते. तो म्हणजे सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागात काही प्रमाणात का होईना रोजगार उपलब्ध करुन त्याद्वारे ग्रामीण भागात संभाव्य स्वरुपात निर्माण होणाऱ्या ताणतणावावर मात करणे हे होय. याच बरोबर महाराष्ट्रात साखर धंद्याच्या माध्यमातून कृषिआधारित समाजाचा

विकास करण्याचा उद्देश येथील सत्ताधारी पक्षाच्या राजकीय स्वैर्यांशी म्हणजे कॉंग्रेसची प्रभुत्व टिकविण्याच्या राजकारणाशी संबंधित आहे.

१९५५ ते १९६० च्या दरम्यान संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या रेट्यातून कॉंग्रेसची पिछेहाट झाली. ती पोकळी भरून काढण्यासाठी कॉंग्रेसने एका नव्याच सत्ताधारी वर्गाची विशेषत: ग्रामीण भागातील सत्ताधारी वर्गाची गरज ओळखली. या सत्ताधारी वर्गाच्या जोरावर व आर्थिक बळावर राजकीय पोकळी भरून काढून कॉंग्रेसचा काहीसा ढासळलेला वर्गीय पाया अधिक व्यापक व भक्कम करण्यासाठी यशवंतराव चव्हाणांच्या धाणाक्ष नेतृत्वाखाली सहकारी साखर कारखानदारीचे परवाने देऊन ग्रामीण भागात नव श्रीमंताचा वर्ग निर्माण करण्यात आला. या सहकारी चळवळीचा राजकीय परिणाम म्हणून आपणास असे दिसते की, महाराष्ट्राच्या राजकारणात गेली तीन दशके साखर कारखानदारीतून निर्माण झालेला हा नवश्रीमंताचा, साखर सम्राटांचा वर्ग (शुगर लॉबी) वर्चस्व गाजवीत आहे. हे वर्चस्व कायम रहावे व त्यातून आपला सर्व प्रकारचा स्वार्थ साधला जावा म्हणून हा वर्ग विकासाच्या नावाखाली महाराष्ट्रात साखर कारखान्यांचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. याचाच भाग म्हणून महाराष्ट्रात जवळपास सर्वच साखर कारखान्याच्या उभारणीच्या पाठीमागे कोणते ना कोणते विशेषत: कॉंग्रेसी पठडीचे राजकीय व्यक्तिमत्व आहे. म्हणजे महाराष्ट्राच्या बाबतीत असे म्हणता येईल की, सहकाराचे अर्थकारण व राजकारण या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत. [६]

## गडहिंग्लज साखर कारखान्याचे विकास कार्य - इ.स. १९७८ ते ८८

गडहिंग्लज साखर कारखाना अल्पभूधारक शेतकऱ्यांचा आहे. ९५ टक्के सभासद एक ते पाच एकर क्षेत्र धारण करणारे आहेत. विशेष म्हणजे

सन १९८०-८१ या सालच्या दुस-या गळीत हंगामातच महाराष्ट्रातील साखर कारखान्यानी दिलेल्या दरामध्ये दुस-या क्रमांकाचा दर दिला. अखिल भारतीय साखर महासंघाने देशातील साखर कारखान्यांची पाहणी करुन पहिल्या पाच कारखान्यांमध्ये गडहिंग्लज साखर कारखान्याची निवड केली होती. या एकाच गोष्टीवरुन गडहिंग्लज साखर कारखान्याचे काम-काज कसे आहे याची सहज कल्पना येते.

गडहिंग्लजला साखर कारखाना होणार, यावर सुरवातीला कुणाचा विश्वास नव्हता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि अडचणींना सामोरे जाऊन मोठया जिद्दीने कारखान्याची उभारणी करण्यात आली. सात-आठ वर्षांपूर्वी तालुक्यात नैराश्याचे आणि वैफल्याचे वातावरण होते. त्या पार्श्वभूमीवर कारखान्याची उभारणी केली व कारखाना उभारणीसाठी घेतलेले साडेतीन कोटी रुपयांचे कर्ज मुदतीत परत करुन कारखाना शेतकरी सभासदांच्या मालकीचा केला. पाच वर्षांच्या मुदतीत कारखाना यशस्वी चालवून कर्जमुक्त केला आणि कारखान्याच्या गाळप क्षमतेचा विस्तार आणि अर्कशाळा असे सात कोटी रुपये खर्चाचे दोन प्रकल्प उभारले. साखर कारखाना अल्प भूधारकांचा असल्यामुळे सभासदांना चांगला दर देण्याची जबाबदारी कारखान्यांनी प्रथमपासून घेतली आहे. इतर कारखान्यांच्या स्पर्धेत चांगला दर देऊन सभासदांचा विश्वास संपादन केलेला आहे. साखर कारखाना विकासाचा केंद्रबिंदू आहे. कारखाना प्रकल्पाकडे विकासाच्या दृष्टीने लक्ष दिले. एका वर्षात उभारणी, मुदतीत कर्जफेड, नवीन प्रकल्पाची उभारणी हे आदी मोजक्या सात-आठ वर्षात घडलेले आहे हे विशेष होय.

शेतक-यांना चांगला दर मिळावा, बैलगाडया, मजूर, टॅक्टर, ट्रक

यांना काम द्यावे. उत्पादनवाढीसाठी प्रयोग करावेत या गोष्टीकडे लक्ष दिले. जुन्या विहिरीत कूपनलिका, नवीन कूपनलिका असे खास कार्यक्रम कारखाना राबवित आहे. केंद्र शासनाच्या योजनेतून तालुक्यात एक हजार कूपनलिका खोदण्यात येणार आहेत. उसाचे नवीन बियाणे देऊन कमी पाण्यात अधिक उत्पादन काढण्यासाठी मार्गदर्शन केले जात आहे. तालुक्यात एक हजार बायोगॅसची उभारणी केली. वृक्ष लागवडी-कडेही कारखान्याने प्राधान्याने लक्ष दिले असून आंबा, नारळ, फणस व इतर अशा दोन लाख रोपांचे वाटप करण्यात आले. ही रोपे जगविण्या-साठी प्रयत्न करण्यात आले. कारखाना परिसरात कर्मचाऱ्यांसाठी सुमारे एक कोटी रुपये खर्च करून आदर्श निवासस्थाने बांधली आहेत. इतर कोणत्याही कारखान्यात अशी व्यवस्था नाही. गडहिंग्लज कारखान्याची उभारणी हा एक वेगळा प्रयोग आहे. शेतकरी हाच केंद्रबिंदू मानून प्रकल्पा-चा लाभ देण्याचा प्रयत्न करण्यात आला. [७] साखर कारखान्याने सन १९७८ ते १९८८ या कालावधीमध्ये पुढील विविध विकास कार्यक्रम राबविले.

१) <u>ऊस विकास</u>

सुरवातीला कारखान्याची गळीत क्षमता दररोज १२५० मे.टन इतकी होती. नंतर २,००० मे. टनापर्यंत गाळपक्षमता विस्तारवाढ योजना राबविण्यासाठी भारत सरकारकडून इरादा पत्र मिळाले आणि १९८७ पासून ही योजना राबविण्यात आली. कारखान्याच्या गाळप क्षमतेनुसार आवश्यक असणाऱ्या उसाचे उत्पादन कारखान्याचे कार्यक्षेत्रातच होणे गरजेचे होते. यासाठी कारखान्याने ऊस विकास योजना केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविली. व केंद्र शासनाने या योजनेकरिता रु. ५८.८३ लाखाचे कर्ज मंजूर केले. त्यापैकी प्रथमवर्षासाठी रु. ३१.०७ लाख रक्कम खालीलप्रमाणे योजना राबविण्यासाठी मंजूर केली.

| | | |
|---|---|---|
| १) | पथ दर्शक ठिबक सिंचन योजना | रू. ३.७० लाख |
| २) | लवकर पक्व होणाऱ्या ऊस जातीचे बेणे पुरवठा | रू. २५.०० लाख |
| ३) | उष्ण बाष्प प्रक्रिया यंत्र | रू. ०.६० लाख |
| ४) | उष्ण बाष्प प्रक्रिया करून बेणे मळे तयार करणे | रू. ०.३५ |
| ५) | वाहन सुविधा | रू. १.४२ लाख |
| | | रू. ३१.०७ लाख |

या योजना राबविल्यामुळे कार्यक्षेत्रात ६५,००० मे.टन ऊस उत्पादन वाढणार होते. कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन कारखान्याने खालील ऊस विकासाच्या योजना राबविण्यासाठी नवीन प्रस्ताव तयार केला.

१) ठिबक सिंचन

२) जुन्या विहीरी दुरूस्ती व नवीन विहीरी खुदाई

३) खोडवा पीक नियोजन

४) जमिनीवरील बोअरिंग योजना

५) उपसा जलसिंचन योजना

६) के.टी. विअर बांधणे

या सर्व योजना तीन चार वर्षात अंमलात येऊन त्याचा खालील प्रमाणे फायदा होणार होता.

१) सध्याचे ऊस क्षेत्राशिवाय जादा १९४० हेक्टर क्षेत्र ऊस पिकाखाली येणार होते व १,८९,००० मे.टन ऊस उपलब्ध होणार होते.

२) साखर उताऱ्यामध्ये ०.३० टक्के वाढ होणार होते.

३) के.टी. विअरमुळे ऊस वाहतूक खर्चामध्ये प्रतिवर्षी ९ लाखांची बचत होणार होती.

४) संपूर्ण गळीत हंगाम संपेपर्यंत कारखान्यास पाण्याचा पुरवठा होणार होता.

ऊस हे या भागातले एकमेव नगदी पीक आहे. म्हणून ऊस विकास योजना यशस्वीपणे राबविणे गरजेचे होते.

२) फलोद्यान व वन विकास योजना

सभासदांना आर्थिक उत्पन्नाचे एक साधन उपलब्ध व्हावे म्हणून कारखान्यामार्फत त्यांना निरनिराळी फळ झाडे रोपे लागवडीसाठी पुरविणेचे धोरण कारखान्याने ठेवले. फळझाडांच्या लागवडी व संवर्धना-बाबत सभासदांना कारखान्याचे ऊस विकास विभागामार्फत संपूर्ण मार्गदर्शन दिले जाते. फळझाडांची रोपे बाहेरुन आणून पुरविणेसाठी वाहतुकीवर होणारा खर्च कमी करणे, निरोगी व खात्रीशीर रोपे कमीतकमी दरात पुरविणे शक्य व्हावे म्हणून कारखान्याने कारखाना साईटवर फळ-झाडांची कलमे बांधणे, रोपे तयार करणे हा कार्यक्रम हाती घेतला आहे. सन १९८८-८९ पर्यंत कारखान्याने २५,२६२ फळझाडे वाटप केली असून लाभार्थी संख्या २,१३२ इतकी होती.

३) निलगिरी प्लँटेशन

कारखान्याने राष्ट्रीय वनीकरणाचा कार्यक्रम प्रभावीपणे राबविणेसाठी पाऊल उचलले. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याचा उपयोग करून साईटवर निलगिरी रोपे लावणेचा कार्यक्रम राबविला आहे. त्यामुळे सांडपाण्यापासून होणारे प्रदूषण टाळणे शक्य झाले आहे. सन १९८८-८९ पर्यंत ५० एकर क्षेत्रात ७५,००० रोपांची लावण करण्यात आली. इतक्या मोठ्या प्रमाणावर निलगिरी रोपे लावण केलेला गडहिंग्लज हा महाराष्ट्रात एकमेव आहे.

४) बायोगॅस योजना

वीस कलमी कार्यक्रमाचा भाग म्हणून कारखान्याने सन १९८३-८४ पासून बायोगॅस योजना राबविली. १९८८-८९ पर्यंत कारखान्यामार्फत एकूण ५६० बायोगॅस बांधले असून या योजनेसाठी शासनाने देऊ केलेल्या सबसिडीशिवाय कारखान्याने ५६० सभासदांना ५६० बायोगॅस बांधण्यासाठी ७,७८,९५९/- रु. इतके अनुदान वाटप केले आहे.

५) मागासवर्गीय अनुदान योजना

महाराष्ट्र शासनाने मागासवर्गीय अल्पभूधारक शेतकऱ्यांना ऊस शेती उद्योग विकसित करण्यासाठी अनुदान योजना स्वीकारली. या योजनेअंतर्गत सन १९८८-८९ सालापर्यंत २३३ लाभार्थी सभासदांना १,८३,२६३/- रु. इतकी अनुदानाची रक्कम ऊस बेणे, खते व रोख रक्कम या स्वरूपात दिले.

तसेच अनुसूचित जाती व नवबौद्ध अत्यल्प भू-धारक शेतक-यांना कारखान्याचे सभासद होणे शक्य व्हावे म्हणून शासनाकडून शेअर्स खरेदीसाठी ५० टक्के बिनव्याजी कर्ज व ५० टक्के अनुदान या स्वरूपात अर्थसहाय्य देण्यात येते. सन १९८८-८९ पर्यंत शासनाने या योजनेअंतर्गत २९१ लाभार्थींना २,९१,०००/- इतके कर्ज व २,९१,०००/- इतके अनुदान मंजूर केले आहे.

६) घरकुल निधी

कारखान्याने गळीत केलेल्या उसावर प्रतिटनी ५० पैसे प्रमाणे रक्कम कपात केली असून या निधीतून बेघरासाठी घरकुल योजना राबविली जाते.

७) अल्पबचत

उसाचे अंतिम बिलातून शासनाच्या आदेशाप्रमाणे अल्पबचत योजने-करिता प्रतिटन १ रु. कपात करून ती पोस्टात गुंतविले जाते. याद्वारे शासनाच्या बचत योजनेस प्रोत्साहन दिले जाते.

८) कुटुंब नियोजन

देशाच्या वाढत्या लोकसंख्येस आळा घातलेशिवाय उत्पादनात कितीही वाढ झाली तरी जनतेचे जीवनमान सुधारणार नाही. म्हणून वीस कलमी कार्यक्रमात कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमास महत्वाचे स्थान दिले आहे. या योजनेस प्रोत्साहन मिळावे म्हणून कारखान्याने विशेष प्रयत्न केले आहेत.

९) सांस्कृतिक कार्यक्रम

राष्ट्रीय कार्यक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम कारखान्यावर उत्साहाने साजरे केले जातात. कामगारांना उत्तेजनार्थ खेळाच्या स्पर्धा व गणेश उत्सव इ. कार्यक्रमामुळे परस्पर सामंजस्य व खेळीमेळीचे वातावरण निर्माण मदत होते.

१०) कामगार कल्याण

कारखान्याने कामगार कल्याणाच्या दृष्टीने काही भरीव स्वरुपाचे उपक्रम हाती घेतले असून त्याअंतर्गत कामगारांच्या हिताचे दृष्टीने "कामगार अपघात विमा" योजना सुरु केली आहे. कमी भाडयात कामगारांना क्वार्टर्स दिले आहेत. कारखान्याने मृत्त सेवकांचे विधवा पत्नींना शिलाई मशीन वाटप करुन त्यांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करुन दिले आहे. कामगाराकरिता विश्रांतीगृह, डायनिंग हॉल बांधकाम सुरु आहे. तसेच वैद्यकीय सेवा पुरविण्यात येणार आहे. कामगारांना टी.व्ही. सेट, स्कूटर, मोटर सायकल इ. वाहने देणेसाठी कारखान्याने हमीपत्र देऊन बँकेमार्फत अर्थसहाय्य मिळवून देते. कारखान्याच्या कामगार पतसंस्थेमार्फत सर्व कामगारांना त्यांच्या आर्थिक गरजेनुसार कर्जपुरवठा केला जातो. या पतसंस्थेमार्फत स्वस्त धान्य दुकान, प्रोव्हिजनल स्टोअर्स इ. जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा क्रेडिटवर देण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. याशिवाय सुरक्षा गार्ड्स, शिपाई, ड्रायव्हर्स यांना गणवेश पुरविला जातो.[८]

वरीलप्रमाणे विविध विकास योजना गडहिंग्लज साखर कारखान्यामार्फत सन १९७८ ते १९८८ या काळात राबविण्यात आल्या. गडहिंग्लज

साखर कारखाना निर्मिती ही गडहिंग्लज तालुक्यातील ग्रामीण भागांची सर्वांगिण सुधारणेची नांदी ठरली. कारखान्यामुळे ग्रामीण भागात वीज पोहचली. शेतक-यांच्या शेतापासून, निवास वस्तीपासून कारखान्यापर्यंत दळणवळणासाठी रस्ते निर्माण झाले. त्या परिसरात पीक कर्ज, खतांसाठी पतपुरवठा करणा-या सहकारी पतसंस्था निर्माण झाल्या. या प्रकारात एक महत्वाचा घटक म्हणजे शेती व्यवसायावर पूर्णपणे अवलंबून राहणा-या कुटुंबातील कर्ती मंडळी शेतीत राबत. त्यापैकी काहींना कारखान्याच्या चालू काळात नियमित रोजगार मिळाल्याने कुटुंबाचा उप-जीविकेचा प्रश्न सुटण्यास मदत झाली. रोजगारासाठी शिफ्ट ड्युटी असल्याने अन्य वेळेत शेतीतच मनुष्यबळ उपलब्ध होऊ लागले. बचतीच्या सवयीने, सहकारी संस्थांच्या नवीन वित्तपुरवठ्यामुळे शेतीपूरक उद्योग झपाट्याने वाढले. सहकारी दूध डेअरीसारख्या प्रकल्पामुळे दुधाला नियमित बाजारपेठ मिळाली. कारखाना परिसराचा आर्थिक विकास झाला. तसेच शिक्षणाचे महत्व पटू लागल्यामुळे कारखाना परिसरातच शैक्षणिक संस्था विकसित झाल्या. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होऊ लागला. नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब होऊ लागला. नवीन तंत्रज्ञानामुळे साखर कारखाना परिसरातच अलकोहोल उत्पादन, कागद निर्मिती, कुक्कुट पालन असे उद्योग-व्यवसाय सुरु झाले. हे आर्थिक क्षेत्रास हातभार लावणारे ठरले.[१]

## सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुका आणि त्यांचे राजकीय परिणाम

महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्रातील राजकारणाचा राज्यपातळी-वरील राजकारणाशी आणि कॉंग्रेस पक्षाच्या राजकारणाशी जवळचा संबंध आहे. सहकाराचा राज्यपातळीवरील राजकारणाशी जवळचा संबंध

असण्याचे महत्वाचे कारण म्हणजे सहकारी संस्थांवर सरकारचे नियंत्रण असते. सहकारी संस्थांची रचना, निवडणुका, अध्यक्षपदाची मुदत, याबाबतचे कायदे करण्याचा राज्यसरकारला अधिकार असतो. शिवाय राज्य पातळीवरील सत्तेत वाटा मिळविण्याची सर्वच राजकीय पुढा-यांची इच्छा असते. कारण राज्य सरकारजवळ साधनसामुग्रीचे वाटप करण्यासाठीची साधने मोठया प्रमाणात उपलब्ध असतात. त्यामुळे सहकारी क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी राजकीय क्षेत्रात भाग घ्यावयास सुरवात केली.

महाराष्ट्राच्या राजकारणात १९६५-६६ नंतर काही बदल झाले. १९६७ साली वसंतराव नाईक हे पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष विनायकराव पाटील हे राज्याचे सहकार मंत्री झाले. साखर कारखान्यामध्ये स्वत:चा पैसा न घालता समाजाच्या पैशाचा गैरवापर करणारे साखरसम्राट निर्माण होत आहेत, हे त्यांच्या लक्षात आले. त्यांच्यावर काही नियंत्रणे आणण्याचा त्यांचा विचार होता. १९६८ साली आणखी काही नव्या साखर कारखान्यांना केंद्र सरकारने मंजुरी दिली. साखर कारखान्यांची संख्या मोठया प्रमाणावर वाढली. साखर कारखान्याचे हितसंबंध राखण्याच्या हेतूने साखर कारखानदार वसंतदादा पाटील यांचे नेतृत्व मानू लागले. पुढे वसंतदादा पाटील महाराष्ट्र काँग्रेस समितीचे अध्यक्ष झाले आणि राज्याच्या राजकारणात वसंतदादांचे महत्व वाढले.

वसंतराव नाईक यांना साखर कारखानदारांच्या वाढत्या सामर्थ्याची भीती वाटत होती, म्हणून त्यांनी सहा वर्षांपेक्षा कोणत्याही पदाधिका-याकडे साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी राहू नये असा कायदा करण्याचा घाट घातला. वसंतदादांनी त्यास विरोध केला. वसंतदादा पाटील

यांची १९७२ मध्ये नाईक सरकारात पाटबंधारे मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. वसंतदादा क्रमांक दोनचे मंत्री होते. त्यांनी मंत्रिपद स्वीकारल्यानंतर सहकारी साखर कारखानदारी लॉबी जास्त प्रबळ झाली. १९७५ साली वसंतराव नाईक यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाल्यावर चार साडेचार महिन्यातच आणीबाणीची घोषणा करण्यात आली. त्यामुळे शंकरराव चव्हाणांचे सामर्थ्य वाढले. त्यांनी सहकारी संस्थांची सत्ता कमी करण्याचा प्रयत्न केला. आणीबाणीच्या काळात त्यांच्या या धोरणामुळे साखर कारखानदार चिडलेले होते. १९७७ साली शंकरराव चव्हाणांची उचलबांगडी करण्यात आली. त्यांच्या जागी वसंत-दादा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. म्हणजेच सहकारी चळवळीतील एक ज्येष्ठ कार्यकर्ता महाराष्ट्राचा मुख्यमंत्री झाला.

१९७८ साली काँग्रेस पक्षात विभाजन झाले. त्याप्रमाणे सहकारी साखर कारखानदारांची लॉबीही विभागली. वसंतदादा पाटील यांच्या गटाव्यतिरिक्त शरद पवार, राजारामबापू पाटील व शंकरराव चव्हाण यांच्या गटातही काही कारखानदार सामील झाले. जुलै, १९७८ मध्ये शरद पवारांनी वसंतदादांचे सरकार खाली खेचले व ते मुख्यमंत्री झाले. त्यामुळे राज्यातील सहकारी साखर कारखानदारांची लॉबी पुन्हा विभागली. वसंतदादा राज्याच्या राजकारणात एकाकी पडले. १९७८ च्या साखर कारखाना निवडणुकीत शरद पवारांच्या गटाने वसंतदादा गटाला मोठे आवाहन दिले होते. पण वसंतदादा गटाने शरद पवार गटाचा सहजगत्या पराभव केला. १९७८-७९ साली वसंतदादा अडचणीत असतानाही सहकारी चळवळीतील त्यांच्या कामामुळे ते राजकारणात टिकू शकले. त्यांनी आपले

सामर्थ्य राखून ठेवले व १९७९ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत सांगली, औरंगाबाद, कोल्हापूर, जळगाव वगैरे जिल्ह्यात चांगल्यापैकी जागा मिळविल्या. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत शरद पवारांनी अनेक साखर कारखानदार उभे केले होते. पण ते पराभूत झाले. खुद्द वसंतदादा लोकसभेवर निवडून गेले. बहुतेक साखर कारखानदारांच्या हे लक्षात आले की, काँग्रेस पक्षाची अधिमान्यता असल्याशिवाय निवडणूका जिंकता येत नाहीत. काँग्रेस सत्ताधारी पक्ष आहे. म्हणून काही दिवसातच बहुसंख्य साखर कारखान्यांचे अध्यक्ष पुन्हा काँग्रेसमध्ये परत आले. खुद्द यशवंतराव चव्हाण १९८१ साली आणि शरद पवार १९८६ साली काँग्रेस पक्षात परतले.

श्री. शंकरराव चव्हाण यांनी पुन्हा मुख्यमंत्री झाल्यावर (१९८६) सहकारी साखर कारखानदारांचे पंख कापावयास सुरवात केली. सहकारी साखर कारखानदारांनी लोकांना गुलाम केले आहे असे त्यांचे मत होते. सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षांनी निर्माण केलेले खाजगी ट्रस्ट त्यांनी सहकारी साखर कारखान्याच्या विद्यमान संचालक मंडळाच्या नियंत्रणाखाली आणले. वसंतदादा त्यावेळी राजस्थानचे राज्यपाल होते. पण शंकरराव चव्हाणांच्या धोरणामुळे आपली लॉबी कमजोर होत आहे, सांगलीतील आपले अनेक जुने पाठीराखे शंकररावांना पाठिंबा देत आहेत, हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी राज्यपाल पदाचा राजीनामा दिला. शरद पवार यांच्यावर जुना राग असूनही त्यांच्याशी हातमिळवणी केली. शरद पवार यांनी मुख्यमंत्रिपद स्वीकारल्यानंतर सहकारी साखर कारखाने आपल्या मागे उभे करण्यास सुरवात केली. पुन्हा एकदा "शुगर लॉबी" चे वर्चस्व प्रस्थापित झाले.

महाराष्ट्राच्या राजकारणावर अशा प्रकारे सहकारी साखर कारखान्याचे वर्चस्व आहे. ते वर्चस्व वाढत आहे. या वर्चस्वाचे स्वरूप अनेकपदरी आहे. कॉंग्रेसपक्ष अशा प्रकारच्या राजकारणास उत्तेजन देतो. महाराष्ट्रात ग्रामीण भागांपर्यंत फक्त कॉंग्रेस पक्षाच पोहोचलेला आहे. सहकारी साखर कारखाने हे ग्रामीण भागातील सधन बागायतदार वर्गाच्या ताब्यात आहेत. सहकारी चळवळीवर मोठया प्रमाणात मराठा जातीचे वर्चस्व आहे. कारण बागायतदार वर्गात याच जातीतील लोक या व्यतिरिक्त जैन, लिंगायत, लेवा पाटील, माळी, धनगर इत्यादी जातीतील काही पुढारीही सहकारी क्षेत्रात यशस्वी झाले आहेत. राजकारणात लोकांना संघटित करण्यासाठी जातीचा वापर केला जातो. महाराष्ट्रात साखर कारखानदारांची लॉबी पुन्हा पुन्हा राज्याच्या राजकारणावर आपला प्रभाव टाकू शकते. कारण प्रभावशाली पक्ष, प्रभावशाली वर्ग व प्रभावशाली जात यांनी या लॉबीला पाठिंबा दिला आहे.

सहकारी साखर कारखानदारांची लॉबी राज्याच्या राजकारणात दबावगट म्हणून काम करते. त्यामुळे राजकारणाशी तिचे जवळचे संबंध आहेत. साखर कारखान्यामुळे व सहकारी चळवळीमुळे ग्रामीण भागाचा काही प्रमाणात विकास झाला. लोक विकासन्मुख झाले. राजकीय कार्यकर्त्यांचे नवे गट तयार झाले. सर्वसाधारण शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे खेळू लागले. या गोष्टी आपणास नाकारता येत नाहीत. पण त्याबरोबर या कारखान्यांची पर्यावरणाचे समतोल व न्याय विकासाचे व लोकशाही सत्तावाटपाचे प्रश्न दुर्लक्षिले आहेत. त्यामुळे साखर कारखाने लोकांचे आरोग्य व पर्यावरण धोक्यात आणीत आहेत. उसाची पिके घेऊन पाण्याचा ज्यादा वापर करून जमिनीचा कस बिघडवत आहेत. त्यामुळे हजारो एकर जमीन दरवर्षी क्षारयुक्त बनत आहे. शेतकऱ्यांना अनेक

बाबतीत गुंतवून त्यास गुलाम करीत आहेत. घराणेशाही अस्तित्वात आली आहे. प्रवरानगर व पाटण येथील कारखान्यात सहकारी साखर कारखानदारांची तिसरी पिढी आज सत्तेवर आहे. त्यामुळे सत्तेचे न्याय व समान वाटप होत नाही. [१०] सहकारी साखर कारखाने म्हणजे राजकीय सत्ता-स्थाने निर्माण झाली आहेत अशी टीका करण्यात येते. वास्तविक सहकारी साखर कारखान्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी संचालकांची निवड करावी अशी अपेक्षा असते.

साखर कारखान्याच्या निवडणुकीचा संबंध शेतकऱ्यांच्या अंतर्गत राजकारणाशी संबंधीत असतो. साखर कारखान्याच्या सत्तेच्या माध्यमातून तालुका आणि जिल्हा राजकारणावर प्रभाव निर्माण करता येतो. कारखान्याचे अंतर्गत राजकारण संचालक मंडळाच्या राजकारणाशी संबंधीत असते. साखर कारखान्याच्या निवडणुका सहकारी संस्था कायद्यानुसार होत असतात. डॉ. बी.एस्. बावीसकर यांनी "विकासाचे राजकारण : ग्रामीण महाराष्ट्रातील साखर सहकार" या पुस्तकात साखर कारखान्याच्या माध्यमातून लोकशाही वाढले आहे असे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्या पुष्ठयर्थ त्यांनी पुढील बाबी नमूद केल्या आहेत.

१) साखर कारखान्याच्या राजकारणातून नव्या ग्रामीण नेतृत्वाचा उदय होतो व त्यांचा संपूर्ण जिल्हा राजकारणावर प्रभाव पडतो.

२) भागधारक शेतकऱ्यांच्यामध्ये राजकीय जाणीव निर्माण होते व त्यांचा राजकीय सहभाग वाढतो.

३) सत्ताधारी राजकीय पक्षाचे संघटन यातून साधते.

४) स्पर्धात्मक लोकशाहीचे वातावरण तयार होते.

५) राजकीय कार्यकर्त्यांची भरती करता येते. त्यांचा पगार, मजुरी व सेवा अटी ठरविता येतात.

६) हितसंबंधी गटांच्या कार्याला चालना मिळते इत्यादि.

यातून राजकारणाचे एक सलग असे चित्र उभे रहाते. मूल्यहीन, नीतिहीन अशा सत्ता-संपत्ती-प्रतिष्ठेसाठी हे राजकारण आहे. त्यासाठी गटबाजी चालते. गाव, जात अशा संकुचित आधारावर राजकारण चालते. अनेक वाम मार्गांचा उपयोग केला जातो. नेतृत्व निर्माण होते. राजकीय जाणीव व सहभाग वाढतो. सत्ताधारी पक्षाचे संघटन साधते. स्पर्धा तयार होते. कार्यकर्ते तयार होतात. हितसंबंधी गट वाढतात.[११]

## गडहिंग्लज सहकारी साखर कारखाना निवडणूक - सन १९८८

गडहिंग्लज साखर कारखान्याच्या १९८१ साली झालेल्या निवडणुकीत तीन पॅनेल्स होते, परंतु नलवडे पॅनेलने बटकडली पॅनेल व शेतकरी पॅनेलचा दारुण पराभव करुन साखर कारखान्याचे संस्थापक व चेअरमन श्री. आप्पासाहेब नलवडे यांनी आपले वर्चस्व सिध्द केले होते. साखर कारखान्याच्या स्थापनेपासून १२ वर्षे श्री. आप्पासाहेब नलवडे यांनी कारखान्याचे अध्यक्षपद भूषविले. परंतु नोव्हेंबर, १९८८ च्या गडहिंग्लज साखर कारखान्याच्या निवडणुकीत विलक्षण चुरस निर्माण झाली होती. साखर कारखाना स्थापनेपासून झालेल्या सर्वच निवडणुका जवळ जवळ एकतर्फी झाल्या होत्या. संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे यांच्या विरोधात या निवडणुकीत प्रथमच सर्व समावेशक "शेतकरी पॅनेल" स्थापन केले. संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब

नलवडे यांना हटविण्यासाठी त्यांना वगळून जनता दलासह सर्व काँग्रेसचे गट एकत्र आले आणि त्यांनी "शेतकरी पॅनेल"ची स्थापना केली. ही निवडणूक नलवडे पॅनेल आणि शेतकरी पॅनेल या दोन तुल्यबळ पॅनलमध्ये झाली.

गडहिंग्लज साखर कारखाना अत्यंत प्रतिकूल अवस्थेत उभा राहिला. जिद्दीने चालविला जाऊन तो कर्जमुक्त करण्यात आला. त्याचा विस्तारही झाला. अर्कशाळा प्रकल्पाची उभारणी झाली. चांगले व्यवस्थापन म्हणून कारखान्याचा गौरव झाला. सत्तारूढ नलवडे पॅनलच्या या सर्व जमेच्या बाजू होत्या. काही प्रमाणात मतदारांची नलवडे पॅनेलला सहानुभूती होती. मात्र एवढ्या भांडवलावर त्यांचा निभाव लागणे शक्य नव्हते. याचे कारण म्हणजे या निवडणुकीत काँग्रेस (आय) चे ज्येष्ठ नेते बाबा कुपेकर यांनी काँग्रेस (आय) चे सर्व गट शेतकरी पॅनलमध्ये आणले होते. शिवाय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना सामावून घेण्यातही ते यशस्वी ठरले होते. शेतकरी पॅनलच्या बाजुने पंचायत समितीचे सभापती आप्पासाहेब पाटील, जिल्हा परिषद सदस्य नागाप्पाण्णा बटकडली, राजकुमार हत्तरकी, तालुका काँग्रेस (आय) चे अध्यक्ष बसगोंडा पाटील, तालुका संघाचे अध्यक्ष विश्वनाथ पाटील, बाजार समितीचे अध्यक्ष रावसाहेब कित्तूरकर आणी प्रमुख नेते मंडळी भक्कमपणे शेतकरी पॅनलच्या पाठीमागे उभी होती. शिवाय आमदार श्रीपतराव शिंदे आणि त्यांचे जनता पक्षाचे सर्व नेते यांची शक्ती शेतकरी पॅनलच्या बाजूने उभी होती. या पॅनलच्या यशस्वी रचनेमुळेच निवडणुकीचे संपूर्ण चित्र पालटले होते. सर्व संस्था आणि प्रमुख कार्यकर्ते एका बाजूस आल्याने नलवडे पॅनल एकाकी पडले होते.

साखर कारखान्याची ही निवडणूक तालुक्याच्या राजकारणावर परिणाम करणारी, राजकारणाला कलाटणी देणारी ठरणार होती.

याचे कारण म्हणजे लवकरच जिल्हा परिषद, पंचायत समित्या, विधानसभा व लोकसभा निवडणुका होणार होत्या. साखर कारखान्याच्या शक्ती केंद्राचा वापर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी झाला पाहिजे. यासाठी पक्षाची वस्त्रे बाजूस ठेवून आम्ही एकत्र आले आहोत. अशी स्वच्छ भूमिका शेतकरी पॅनलचे घेतल्याने मतभेदाचा मुद्दाच नाही, असे या पॅनलचे सूत्रधार बाबा कुपेकर यांनी सांगितले. हा प्रयोग नवा नाही. "पुलोद" म्हणून जनता पक्षाचे आमदार श्रीपतराव शिंदे यांना निवडून दिले. जिल्हा दूध संघात दोन कॉंग्रेस (आय) व एक जनता असे तीन संचालक याच तालुक्यातून निवडून दिले. ते उत्तम तऱ्हेने कार्य करीत आहेत. कारखाना निवडणुकीतही आमचा तोच दृष्टिकोन आहे. येथे प्रश्न तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचा आहे. धरणप्रश्नांचा पाठपुरावा करण्याचा आहे. शेतकरी पॅनल जर सत्तेवर आले, तर पाणी प्रश्नाला प्राधान्य देईल असे कुपेकर यांनी स्पष्ट केले.

साखर कारखाना संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे यांचा दृष्टिकोन वेगळा होता. साखर कारखाना म्हणजे राजकारणाचा अड्डा होऊ नये, कारखान्याची उभारणी अल्पावधीत केली. मुदतीत कर्जफेड झाली. उत्तम व्यवस्थापन आहे. राष्ट्रीय पातळीवर कारखान्याचा गौरव झालेला आहे. कारखान्याचा विस्तार झाला. अर्कशाळा उभी केली. आता तालुक्याच्या एकेका प्रश्नाकडे लक्ष दिले जाईल असे नलवडे यांचे म्हणणे होते.

कारखाना कार्यक्षेत्रात १०२ गावाचा समावेश आहे. मात्र २० ते २५ गावात मतदारांची संख्या अधिक होती. काही आठवडे प्रचाराची रणधुमाळी

सुरु होती. रात्रंदिन गाडयांची पळवापळव, कार्यकर्त्यांची वर्दळ खटोपाडी होती. प्रचार पत्रके, भिंतीपत्रके, बॅनर, जाहीर सभा, भेटीगाठी, कार्यकर्त्यांच्या बैठका अशा त-हेने प्रचार कार्य करण्यात आले. मतदारांची संख्या ६२१० इतकी होती. [१२]

## साखर कारखाना निवडणुकीत शेतकरी पॅनलचा विजय

अत्यंत चुरशीने व अटीतटीने झालेल्या गडहिंग्लज साखर कारखान्याच्या निवडणुकीत सत्तारूढ नलवडे पॅनलचा पराभव करून विरोधी शेतकरी पॅनलचे सर्व १८ उमेदवार विजयी झाले. आमदार श्रीपतराव शिंदे, बाबासाहेब कुपेकर, नागाप्पाण्णा बटकडली, राजकुमार हत्तरकी, आप्पासाहेब पाटील, डॉ. एस.एस. शहापूरकर यांच्या शेतकरी पॅनलने सर्व जागा जिंकल्या. श्री. आप्पासाहेब नलवडे हे स्थापनेपासून सुमारे १२ वर्षे गडहिंग्लज साखर कारखान्याचे अध्यक्ष होते. यापूर्वीच्या निवडणूका एकतर्फी झाल्या होत्या. यावेळी मात्र काँग्रेसचे सर्व गट व जनता पक्ष यांनी एकत्र येऊन सर्वसमावेशक शेतकरी पॅनल तयार केले होते. शेतकरी सभासदांनी सत्ताबदलाचा कौल देऊन सत्तांतर घडविले.

नवनिर्वाचित शेतकरी पॅनलमधून निवडून आलेल्या संचालकात ५ वकील, १ डॉक्टर व १ आमदार यांचा समावेश होता. नलवडे पॅनलचा एकही उमेदवार विजयी झाला नाही. स्वत: संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे हे ४४ मतांनी पराभूत झाले. या निवडणुकीचा निकाल पुढीलप्रमाणे -

## गडहिंग्लज साखर कारखाना निवडणूक – सन १९८८ निवडणूक निकाल

तक्ता

एकूण मतदार – ६,२१० झालेले मतदान – ५,३१२

संस्था मतदान – ३१ झालेले मतदान – १९

मतदान टक्केवारी – ६६

| अ.नं. | गट नंबर व नांव | विजयी उमेदवाराचे नाव | एकूण मिळालेली मते |
|---|---|---|---|
| १) | गट नं.१ | श्री. नागाप्पाण्णा बटकडली | २,८०१ |
| २) | कडगांव-कौलगे गट | " अॅड. दत्ता मगदूम | २,६६२ |
| ३) | | " जयसिंगराव पाटील | २,६२९ |
| ४) | गट नं. २ | " बाबूराव मदकरी | २,६९४ |
| ५) | गडहिंग्लज-हनिमनाळ गट | " शंकरराव मैल्ले | २,६८० |
| ६) | | " अॅड. सुभाष शिंदे | २,६४१ |
| ७) | गट नं. ३ | " ईश्वर गोरूले | २,७०३ |
| ८) | भडगाव-मुगळी गट | " बी.टी. पाटील | २,५८१ |
| ९) | | " बाबासाहेब पाटील | २,७५२ |
| १०) | गट नं. ४ | " आम. श्रीपतराव शिंदे | २,५९१ |
| ११) | नूल-नरेवाडी गट | " तानाजी मोकाशी | २,६५३ |
| १२) | | " बसवाणी जाधव | २,६५३ |
| १३) | गट नं. ५ | " रावसाहेब देसाई | २,७३२ |
| १४) | महागाव-हरळी गट | " शिवमूर्ती मोर्ती | २,७३१ |
| १५) | | " अॅड. अर्जुन रेडेकर | २,७२६ |
| १६) | दुर्बल घटक | " बाबूराव पाटील | २,७७६ |
| १७) | मागास गट | " अॅड. श्रीमंतराव पाटील | २,७८६ |
| १८) | सेवा संस्था गट | " डॉ. शारदचंद्र शहापूरकर | १९ |

वरीलप्रमाणे साखर कारखाना निवडणूक निकाल लागून नलवडे गटाला या निवडणूकीत दारुण पराभव स्वीकारावा लागला. निकाला-बाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना श्री. बाबा कुपेकर म्हणाले की, "सभासदांना बदल हवा होता. तालुक्याच्या विकासाची कोंडी फुटावी असे संपूर्ण तालुक्याचे मत होते. त्यातून हा बदल झाला."

आमदार श्रीपतराव शिंदे म्हणाले की, कारखान्याच्या शक्तीचा वापर शेतकऱ्यांचे हित आणि तालुक्याचा विकास यासाठीच केला जाईल.[१३]

शेतकरी पॅनलच्या विजयाची कारणे

संपूर्ण कोल्हापूर जिल्हयाचे लक्ष लागून राहिलेल्या गडहिंग्लज तालुका सहकारी साखर कारखान्याचे संचालक मंडळाचे निवडणूकीत आमदार श्रीपतराव शिंदे, राजकुमार हत्तरकी, बाबासाहेब कुपेकर, नागाप्पाण्णा बटकडली, डॉ. शारदचंद्र शहापूरकर, आजरा पंचायत समितीचे सभापती बळीराम देसाई, गडहिंग्लज पंचायत समितीचे सभापती आप्पासाहेब पाटील, तालुका संघाचे चेअरमन ॲड. विश्वनाथ पाटील आणि गडहिंग्लजचे नगराध्यक्ष शिवाजीराव खणगावे यांचे पुढाकाराने निर्माण झालेल्या आघाडीने शेतकरी पॅनेल करुन कारखान्याचे संस्थापक चेअरमन पी.आर. उर्फ आप्पासाहेब नलवडे यांचे पॅनेलचा पराभव केला आणि सहकार क्षेत्रातील आजवरच्या अनुभवाना जबरदस्त धक्का दिला. गडहिंग्लज कारखान्याची १९८१ साली झालेली निवडणूक ही जनता पक्षाशी सहकार्य करुन श्री. नलवडे यांनी मोठया आरामात जिंकली होती. त्यावेळी कारखाना नुकताच सुरु झाला होता. विरोधातून कारखाना उभा केला म्हणून सभासदांची प्रचंड सहानुभूती त्यावेळी नलवडे यांना मिळाली होती. परंतु गेल्या सुमारे सात-आठ वर्षात तालुका राजकारणात अनेक बदल घडून आले.

राजकारणाचे नवे संदर्भ यावेळी निर्माण झाले. गडहिंग्लज तालुक्यात जनता पक्षाची ताकद वाढून त्या पक्षाचे नेते श्रीपतराव शिंदे दरम्यानच्या काळात आमदार झाले होते. त्यामुळे त्यांच्या पक्षाच्या अपेक्षा सहाजिकच वाढल्या होत्या. शेतकरी पॅनलच्या विजयाची कारणमीमांसा पुढीलप्रमाणे करता येईल.

१) सामान्य शेतकरी सभासदात प्रचंड नाराजी निर्माण झाल्याचे जाणवत होते. काही विशेष तक्रार न करणारा शेतकरी हल्ली बोलू लागला होता. सभासदात अनेक कारणांनी असंतोष धुमसत होता. प्रामुख्याने चेअरमन आप्पासाहेब नलवडे यांची एकसत्ताक कारभार करण्याची वृत्ती व सामान्य शेतकरी सभासदाशी दिवसेंदिवस वाढत जाणारी दरी त्याबरोबरच तोडणी-ओढणी कामगारातील असंतोष, कारखान्याचे कार्यक्षेत्राबाहेरचा इतर राज्यातून गेटकेन म्हणून घेतलेला ऊस, प्रशासनात या तालुक्याचे बाहेरचे नोकरांचे वाढते प्राबल्य आणि कारखान्याचे कार्यक्षेत्रातील अनेक तरुण बेकार फिरत असताना पंढरपूर व इतर दूरच्या भागातून झालेली नोकर भरती इत्यादी प्रमुख कारणामुळे नलवडे पॅनल विरोधी असंतोष होता.

२) आप्पासाहेब नलवडे यांनी प्रतिकूल परिस्थितीत हा कारखाना उभारण्यासाठी मोठे परिश्रम घेतले. शेतकऱ्यांचे उसाला चांगला भाव दिला. कारखान्याची गाळपक्षमता वाढविली आणि डिस्टलरी उभारून आपल्या प्रशासनाची ताकद दाखवून अल्पकाळात कारखान्याला देशात नवा क्रमांक मिळवून दिला. यासारख्या जमेच्या बाजू श्री. आप्पासाहेब नलवडे यांचेकडे होत्या. परंतु बाबासाहेब कुपेकर, राजकुमार हत्तरकी, नागाप्पाण्णा बटकडली व आमदार श्रीपतराव शिंदे यांनी तालुक्यातील कार्यकर्ते आणि सामान्य शेतकरी यांचे मनात वाहणाऱ्या वाऱ्याला अचूक ओळखले आणि

सभासदांच्या मनात असणाऱ्या सार्वत्रिक भावनेला संघटीत करण्यामध्ये मोठे यश मिळाले. त्यामुळेच सहकारी क्षेत्रातील हा क्रांतीकारक बदल घडू शकला व शेतकरी पॅनेल यशस्वी होऊ शकले.

३) कारखान्याचे कार्यक्षेत्रात नेसरी व आजरा भागातील नवीन गावांची वाढ झाल्याने सुमारे १,५०० नवीन सभासद वाढले होते. या सभासदांचा कौल नक्की कोणाच्या बाजूने लागणार यावर कारखान्याच्या निवडणुकीचा निर्णय लागणार असा जाणकारांचा अंदाज होता. आजरा तालुक्याचे सर्वसामान्याचे नेते बळीराम देसाई यांनी शेतकरी पॅनेलला पाठिंबा दिल्यामुळे शेतकरी पॅनेल विजयास हातभार लागला.

४) काँग्रेस (आय) मधील गट आणि जनता पक्ष यांची युती कशी होणार याबाबत लोकांच्या मनात शंका होती. परंतु परिस्थितीच्या रेटयापुढे ही युती झाली म्हणण्यापेक्षा मनापासून झाली व शेवटपर्यंत घट्ट राहिली. सर्वच पक्षाचे व गटाचे प्रमुख कार्यकर्त्यांनी प्रसंगी कितीही त्याग करावा लागला तरी आघाडी करावयाचीच असे ठरविल्यामुळे काँग्रेसचे राजकुमार हत्तरकी गटाला ६, जनता पक्षाला ६, व पूर्वीच्या समाजवादी काँग्रेसचे नेते बाबासाहेब कुपेकर यांचे गटाला ५ व कारखान्याचे सर्वात जुने संस्थापक सदस्य व ज्येष्ठ नेते नागाप्पाण्णा बटकडली हे एक असे जागावाटप करण्यात आले. जागा वाटपानंतर कोणत्याही प्रकारे कुरबुरी न करता कारखाना ताब्यात घ्यावयाचा या जिद्दीने कार्यकर्ते कामाला लागले. दोन्ही पॅनेलकडून विधानसभा निवडणुकीच्या पेक्षाही अधिक यंत्रणा निर्माण करून प्रचार झाला. सर्व सभासदांना भेटण्यासाठी कार्यकर्त्यांनी सारा परिसर अक्षरशः पिंजून काढला.

५) सभासद अनामत म्हणून ठेवलेली अंदाजे ७०० शेतक-यांची १४ लाख रुपये आणि शेतक-यांना सभासदत्वाच्या हक्कापासून वंचीत ठेवणे, हा कारखाना एका व्यक्तीचा नसून तो सर्व सभासदांचा आहे. हे शेतकरी पॅनेलने केलेले महत्वाचे अपील, गडहिंग्लज शहरात दर्जा कमी करणारे फलक-युध्द, स्थानिक लोकांना डावलून केलेली नोकरभरती, शेतकरी पॅनेलने केलेले अनेक जाहीर सवाल, शेतकरी पॅनेलमधील सर्व गटाची व पक्षाची एकत्रित काम करण्याचे जाहीर आश्वासन व शेतकरी सभासद हा मध्यवर्ती घटक समजून केलेला जोरदार प्रचार यामुळे हा क्रांतीकारक सत्ताबदल झाला. [१४]

६) आप्पासाहेब नलवडे गटाचा पराभव का झाला ? आणि परस्पर विरोधी राजकीय मते असलेली मंडळी एकत्र येऊन त्यांनी केलेल्या शेतकरी पॅनलला मतदारांनी विजयी का केले ? या प्रश्नांची उत्तरे शोधावयाची तर संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे यांच्या निवडणूक व्यूहरचनेकडे पाहावे लागेल. यापूर्वी झालेल्या निवडणूका केवळ उपचाराचा भाग होता. आठ वर्षापूर्वी झालेली निवडणूक थोडी चुरशीची झाली, पण जनता पक्षाच्या सहाय्याने नलवडे पॅनलने विजय मिळविला. यावेळी मात्र त्यांनी थोडी ताठर भूमिका घेतली. इतर कुणाशी बोलणीच केली नाहीत. जर हे घडले असते तर निवडणूक बिनविरोध पार पडली असती. श्री. नलवडे यांनी आपल्या नावाचे नलवडे पॅनेल तयार केले आणि निवडणूकीची तयारी केली.

७) गेल्या निवडणुकीत ज्या जनता पक्षाची मदत घेतली त्यांच्याशीही चर्चा केली नाही. निवडणूक आपण नक्की जिंकणार अशा आत्मविश्वासाने नलवडे यांनी इतरांकडे दुर्लक्षा केले. विरोधकांचे पॅनल तयार होणार नाही, झाले तरी टिकणार नाही. परस्पर विरुध्द विचारांची मंडळी एकत्र येऊन शकणार नाहीत. हा आप्पासाहेब नलवडे यांचा होरा होता. तो अंदाज साफ चुकला.

८) ज्येष्ठ नेते बाबा कुपेकर यांनी मोठया कौशल्याने तालुका कॉंग्रेस-मधील सर्व गट आणि जनता पक्षाला एकत्र आणून शेतकरी पॅनलची यशस्वी रचना केली. या पॅनलची रचना झाली त्याच दिवशी निवडणुकीचा निकाल लागला होता. याचे कारण म्हणजे गडहिंग्लज पंचायत समिती, तालुका संघ, नगरपालिका, आजरा पंचायत समिती या प्रमुख संस्थांसह छोटया मोठया संस्था, त्यांचे पदाधिकारी, तालुक्यातील प्रमुख मंडळी, कॉंग्रेस (आय) व जनता पक्षाचे शेकडो कार्यकर्ते शेतकरी पॅनेलच्या पाठीशी उभे ठाकले.

याउलट अवस्था सत्तारूढ नलवडे पॅनेलची होती. गाडया व इतर यंत्रणा प्रचंड होती. तथापि कार्यकर्त्याअभावी यंत्रणा राबविता आली नाही. रत्नाप्पा कुंभार गटाचे काही कार्यकर्ते आणि शेतकरी कामगार पक्षाची काही मोजकी ताकद नलवडे पॅनलच्या बाजूने होती.

९) संपूर्ण निवडणूक काळात शेतकरी पॅनेलचा सर्वत्र प्रभाव होता. नलवडे पॅनेल एकाकी पडल्याची स्थिती होती. शेवटच्या टप्प्यात शेतकरी पॅनेलने दीड हजारावर कार्यकर्त्यांचा मेळावा पालिकेच्या सभागृहात घेतला. पाचही गटातील मतदारांना आदल्या दिवशी एकत्र वाहनाने निवडणूक स्थळावर नेण्याची व्यवस्था केली होती. कार्यकर्त्याअभावी नलवडे गटास हे शक्य झाले नाही. एवढया प्रतिकूल अवस्थेतही आपले पॅनल नक्की विजयी होणार हा आप्पासाहेब नलवडे यांचा आत्मविश्वास होता.

१०) सेवा संस्था गटात मोजके ३१ प्रतिनिधी मतदार होते. शेतकरी पॅनेलने १५ दिवस आधीच १९ सभासद ताब्यात घेऊन त्यांना कर्नाटक, गोवा सहलीवर नेले होते. हे सर्व प्रतिनिधी भावे फेटे बांधून मतदानासाठी हजर झाले. येथूनच शेतकरी पॅनेलचा विजय नक्की होत गेला.

११) साखर कारखाना सभासदांचा, शेतक-यांचा, तालुक्याचा आहे. कारखान्याच्या माध्यमातून शेतक-यांचा विकास झाला पाहिजे, तालुक्याच्या विकासाला भरती आली पाहिजे हेच सूत्र घेऊन शेतकरी पॅनेलने प्रभावी प्रचार केला.

१२) श्री. बाबासाहेब कुपेकर, श्रीपतराव शिंदे यांनी अनेक सभा घेतल्या. प्रतिसादही चांगला मिळत होता. याउलट नलवडे गटाने मात्र वैयक्तिक भेटी गाठीद्वाराच प्रचार केला. शेतकरी मतदारांनी आपला कौल देऊन संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे यांची सत्ता संपुष्टात आणून शेतकरी पॅनलला विजयी केले.

साखर कारखाना नेतृत्वात सहजासहजी बदल घडत नाही. गडहिंग्लज साखर कारखान्याच्या सभासदांनी मात्र हा बदल घडविला. कारखान्याची स्थापना करुन गेली १२ वर्षे अध्यक्षपदावर असलेले आप्पासाहेब नलवडे यांची सत्ता संपुष्टात आली. कारखान्याच्या निवडणुकीचा हा निकाल बाहेरच्या मंडळींना धक्कादायक वाटत असला तरी स्थानिक परिस्थिती लक्षात घेतली तर हा निकाल अपेक्षितच होता.[१५]

निवडणूक जिंकण्यात यशस्वी ठरलेल्या शेतकरी पॅनेलला अनेक आव्हानांना तोंड देऊन हा कारखाना म्हणजे सामान्य शेतकरी सभासदांचे सार्वत्रिक मालकीचा आहे हे सत्यात उतरविण्याची कृती लागणार होती. सभासदांनी अत्यंत विश्वासाने हा जो बदल घडविला तो योग्य, अंतिम तालुक्याच्या विकासासाठी हे उपयुक्त होणार की नाही यासाठी नेत्यांना कसोटीला उतरावे लागणार होते. शेतकरी पॅनेलमध्ये अॅड. दत्ता मगदूम

व श्री. शंकरराव मेंडुले हे दोघेच कारखान्याचा अनुभव असणारे जुने संचालक होते. तर आमदार श्रीपतराव शिंदे, नागाप्पा बटकडली, ईश्वर गोरूले, रावसाहेब देसाई, तानाजीराव मोकाशी व डॉ. एस्.एस्. शहापूरकर यांचेसारखे सार्वजनिक जीवनाचा अनुभव असणारे संचालक निवडून आले होते.

## डॉ. शरदचंद्र शहापूरकर यांची साखर कारखाना अध्यक्षपदी निवड आणि पक्षीय राजकारण

गडहिंग्लज साखर कारखाना निवडणुकीत कॉंग्रेसचे सर्व गट आणि जनता पक्ष यांनी एकत्र येऊन शेतकरी पॅनलची निर्मिती केली. साखर कारखाना जिंकला आणि राजकीय कटकटींना प्रारंभ झाला. अध्यक्ष निवडीपासून गटबाजी आणि पक्षीय राजकारण सुरु झाले. डॉ. शरदचंद्र शहापूरकर यांनी अध्यक्षपदाची आणि उपाध्यक्षपदाची ॲडव्होकेट हणमंतराव पाटील यांनी सूत्रे घेतली. या निवडीमागे मोठे नाट्य होते. संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे यांच्या पॅनलचा पराभव करून शेतकरी पॅनलची मंडळी सत्तेवर आली. सत्तांतर घडले म्हणून काहींना धक्का बसला. शेतकरी सभासदांनी मात्र जाणीवपूर्वक हा बदल केला होता असे मानण्यात येत असतानाच अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीच्या वेळीच घडलेले नाट्य म्हणजे पहिल्याच घासाला खडा अशी अवस्था झाली.

शेतकरी पॅनलद्वारे कॉंग्रेसचे दोन गट आणि जनता पक्ष मंडळी एकत्र आली. निवडणुकीतून सत्तांतर घडून कारखाना जिंकू अशी अपेक्षा बाळगणे धाडसाचे होते. पॅनलची रचना योग्य झाली, वातावरण अनुकूल बनत

गेले आणि सत्तांतर घडले. शेतकरी पॅनललाही हा एक सुखावह धक्का होता. १८ संचालक विजयी झाले. एकमुखी कारभार होणार का ? अध्यक्ष कोण होणार ? याचे अंदाज बांधून निकालादिवशीच गणिते मांडली जाऊ लागली. पॅनलची रचना झाली. त्यात कॉंग्रेसचे १२ संचालक आणि जनता पक्षाचे ६ असे बलाबल होते. अध्यक्षपदाची हालचाल सुरु झाली. इच्छुक मंडळींची संख्या वाढू लागली. नावांची चर्चा सुरु झाली. कॉंग्रेसची मंडळी एक होण्याची भाषा करु लागली. नेते मंडळींना डोकेदुखी सुरु झाली. जनतेला दिलेली आश्वासने, कारखान्यातील सत्तांतर होऊन कारभार करण्याचे आव्हान या पार्श्वभूमीवर अध्यक्षपद कोणास द्यायचे हा मोठा प्रश्न होता. कॉंग्रेसमधील इच्छुकाप्रमाणेच जनता पक्षाचे आमदार श्रीपतराव शिंदे यांचे नावही चर्चेत होते. त्यांना कॉंग्रेसमधील काही संचालकांचा पाठिंबा होता. अध्यक्षाची निवड एकमताने झाली पाहिजे असे सर्वांचे मत होते. प्रयत्नही तसाच होता. त्यासाठी अध्यक्ष निवडीच्या आदल्या दिवशी सर्वच नवनिर्वाचित संचालकांची आंबोली येथे बैठक घेण्यात आली. एक समिती नेमण्यात आली. आजऱ्याचे बळीराम देसाई, गडहिंग्लजचे सभापती आप्पासाहेब पाटील, ज्येष्ठ नेते बाबा कुपेकर, राजकुमार हत्तरकी आणि नगराध्यक्ष शिवाजीराव खणगावे यांनी एकमताने अध्यक्षपदासाठी नाव निश्चित करण्यासाठी प्रयत्न केले. आंबोली येथील बैठकीत अध्यक्षपदासाठी ॲड. हणमंतराव पाटील यांच्या नावावर कॉंग्रेसच्या संचालकमंडळींनी शिक्कामोर्तब केले. मात्र पहाटे कानडेवाडीत बाबा कुपेकर यांच्या निवासस्थानी हे नाव मागे पडले आणि डॉ. शारदचंद्र शहापूरकर यांचे नाव अध्यक्षपदासाठी निश्चित करण्यात आले आणि उपाध्यक्षपदासाठी हणमंतराव पाटील यांची निवड करण्याचा निर्णय घ्यावा लागला. डॉ. शारदचंद्र शहापूरकर हे बाबा कुपेकर गटाचे आणि हणमंतराव पाटील हे हत्तरकी

गटाचे होते. ही दोन्ही नावे जनता पक्षाला मान्य नव्हती. त्यामुळे त्यांनी निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. अध्यक्षपदासाठी आमदार श्रीपतराव शिंदे यांनी आणि उपाध्यक्षपदासाठी बी.टी. पाटील यांनी अर्ज दाखल केले. मात्र अध्यक्षपदाऐवजी केवळ उपाध्यक्ष-पदाची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेऊन आमदार श्रीपतराव शिंदे यांनी आपला अर्ज मागे घेतला. डॉ. शारदचंद्र शहापूरकर बिनविरोध निवडून आले. कॉंग्रेसच्या मंडळींनी आनंद व्यक्त केला, मात्र तो क्षणिक ठरला. उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत मतदान होऊन दोन्ही उमेदवारांना समान मते पडली आणि चिठ्ठीवर ॲड. हणमंतराव पाटील विजयी झाले. इथे मतदानाची अवस्था पाहिली तर जनता पक्षाचे ६ संचालक असताना त्यांच्या उमेदवारास ९ मते पडली. नशिबाने चिठ्ठीवर विजय मिळाला आणि सभागृहात दोन्ही बाजूचे समान बळ झाले. राजकारणाची वस्त्रे बाजूस ठेवून कारखान्याचा कारभार एकमताने करण्याची भाषणे, आश्वासने अद्याप हवेत विरलेली नाहीत तोच उपाध्यक्षपदाच्या निवडीत गटबाजी उघड व्हावी ही अवस्था शेतकरी पॅनलच्या नेतृत्वाला भूषणावह नव्हती. शेतकरी सभासदांना पश्चाताप करण्याची पाळी शेतकरी पॅनल आणणार काय ? हा प्रश्न निर्माण झाला होता.[१६]

गडहिंग्लज साखर कारखाना अध्यक्षपदाच्या निवडीपासूनच गाजू लागला. तेथे घडणाऱ्या घटना शेतकरी सभासदांना अस्वस्थ करू लागल्या. एकमताने निवडून आलेले शेतकरी पॅनलचे १८ सभासद, अध्यक्षपदाच्या निवडीवरून संचालक मंडळात झालेली फाटाफूट, गळीत हंगामाच्या प्रारंभी झालेला तोडणी कामगारांचा संप, संचालक मंडळाच्या गाजणाऱ्या बैठका, कार्यकारी संचालक एम्.के. सावंत यांची सेवामुक्ती आणि सचिव शिंदे यांना केलेली मारहाण या ठळक घटना होत. या घटना सुरवातीच्या तीन

महिन्यात घडल्या. शेतकरी सभासदांनी पूर्ण विश्वास ठेवून शेतकरी पॅनल निवडून दिले. मात्र अध्यक्ष निवडीच्या पहिल्या बैठकीपासून सभासदांना पश्चातापाची पाळी यावी अशा घटना घडू लागल्या. अध्यक्ष निवडीच्यावेळी शेतकरी पॅनलची दोन छकले झाली. बाबा कुपेकर गटाचे तानाजी मोकाशी आणि बाबूराव मदकरी जनता पक्षाच्या छावणीत गेले, तर जनता पक्षाचे ॲड. अर्जुन रेडेकर यांनी कॉंग्रेस (आय)ची छावणी गाठली. राजकुमार हत्तरकी, बाबा कुपेकर ही कॉंग्रेसची मंडळी एकीकडे झाली. त्यांच्या बाजूस ११ संचालक आणि जनता पक्षाच्या बाजूस ७ संचालक असे दोन गट निर्माण झाले.

कॉंग्रेस (आय) जनता पक्ष अशी जोरदार रस्सीखेच सुरु झाली. एकमेकावर कुरघुडया करण्याचे प्रयत्न सुरु झाले. बहुमत असल्याने सर्व समित्या कॉंग्रेस (आय) ने आपल्याकडे ठेवल्या. विरोधी गटातील एकाही संचालकास कुठल्याही समितीवर घेतले नाही. संचालक मंडळात उघड दोन गट पडल्यामुळे बैठका मात्र गाजू लागल्या. बहुमताच्या जोरावर विरोधकांची चिंता न करता कामकाज रेटले गेले. सत्तांतर होऊन कारखाना शेतकरी पॅनलने जिंकल्यामुळे यंत्रणेत मोठया प्रमाणावर बदल अपेक्षित होते. त्यानुसार कार्यकारी संचालक एम्.के. सावंत यांना सेवामुक्त करण्याचा निर्णय संचालक मंडळाने बहुमताने घेतला. या प्रकरणात जनता गटाने विरोध नोंदविला. कार्यकारी संचालकांना काढण्याच्या पध्दतीला त्यांनी विरोध असल्याचे स्पष्ट केले. या निर्णयानंतर कार्यकारी संचालक सावंत यांच्या चिरंजीवाने कारखान्याचे सचिव शिंदे यांना बेदम मारहाण केली. या मारहाण प्रकरणाने कारखान्यातील वातावरण तापले. कामगार संतप्त झाले. कार्यकारी संचालकांना पोलिसांचे संरक्षण घेऊन कारखाना परिसराबाहेर जावे लागले.

आरोप-प्रत्यारोप आणि एकमेकावर कुरघोडया करण्यातच दोन्ही गटाची मंडळी भूषण मानू लागली. कारखान्याचे हित, सभासदांचे कल्याण, तालुक्याचा विकास या गोष्टी मागे पडल्या. अध्यक्ष डॉ. शारदचंद्र शहापूरकर यांच्याविरुद्ध गंभीर आरोप केले जाऊ लागले. सत्तासूत्रे घेतल्यानंतर प्रथम वर्षी झालेली वार्षिक सभा याच मतभेदातून उधळण्यात आली. गळित हंगामाच्या प्रारंभी ऊस तोडणी कामगारांचा संप झाला. कारखाना काही दिवस बंद पडला. गळित हंगाम झाला, पण गाळप कमी झाले. अर्कशाळेबाबतही तक्रारी होत्या. अशा अडचणींच्या शर्यतीतून कारखान्याचा गाडा हाकला जाऊ लागला. कारखाना चांगला चालावा, चांगला दर मिळावा ही शेतकऱ्यांची अपेक्षा होती. मात्र संचालक मंडळात तीव्र मतभेद होते. अशा घटनामुळे शेतकरी सभासद अस्वस्थ झाले. प्रा. सुभाष शिरकोळे यांनी शासनाला कारखाना बचाव समितीच्यावतीने विविध आरोपांचे निवेदन दिले. कारखान्याचा कारभार आणि आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण यामुळे गोंधळाची अवस्था निर्माण झाली होती.[१७] गडहिंग्लज सहकारी साखर कारखाना शेतकरी सभासदांचा आहे, कष्टकऱ्यांचा आहे, जनतेचा आहे यांची जाणीव कारखान्याच्या कारभाराला योग्य दिशा देण्याचे प्रयत्न अध्यक्ष डॉ. शारदचंद्र शहापूरकर करीत होते. अडीच हजार गाळप क्षमता असलेल्या इतर साखर कारखान्याच्या तुलनेत इथल्या यंत्रणेत बरीच कमतरता आहे. कारखान्यात निवडून आलेली मंडळी भिन्न विचारांची आहेत. कामाच्या बाबतीत मतभेद असतील. परंतु कारखाना प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा, तालुक्याचा विकास करणे या मुद्याशी कुणाचेच मतभेद नाहीत असे अध्यक्ष डॉ. शहापूरकर यांचे मत होते. ऊसाचे क्षेत्र वाढविणे, पाणी पुरवठ्यासाठी छोटे मध्यम पाटबंधारे प्रकल्प हाती घेणे, शेतकरी सभासद व मजूर यांच्या विकासाला हातभार लावण्याची गरज आहे, असे डॉ. शहारपूरकर यांचे मत होते.

साखर कारखाना गटबाजी राजकारणात अध्यक्ष

डॉ. शारदचंद्र शहापूरकर यांचा बळी

डॉ. शारदचंद्र शहापूरकर सरळ मनाचे, स्वच्छ चारित्र्याचे होते. कोल्हापूर येथील आपला वैद्यकिय व्यवसाय आणि कोलगे येथील वडिलोपार्जित शेती पाहत मजेत दिवस कंठणा-या डॉ. शहापूरकर हे थोडया अपघाताने साखर कारखान्याच्या राजकारणात ओढले गेले. गडहिंग्लज साखर कारखान्याच्या स्थापनेत त्यांचे वडील काका शहापूरकर यांचा मोठा वाटा होता. त्यांच्या नावाचे वलय आजही शेतक-यांच्या मनात आहे. संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे यांच्याविरूद्ध उभारण्यात आलेल्या शेतकरी पॅनलच्या रचनेत डॉ. शारदचंद्र शहापूरकर यांचा मोठा सहभाग होता. निवडणूक झाली आणि शेतकरी पॅनल संपूर्ण विजयी झाले. विजयी झालेली संचालक मंडळी साखर उद्योगात नवखीच होती. शिवाय काँग्रेसमधील दोन-तीन गट आणि जनता पक्षाची काही मंडळी असे संयुक्त शेतकरी पॅनल होते. पुढे अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीच्यावेळी गटबाजीने डोके वर काढले. राजकारणाचे जोडे कारखानाप्रवेशद्वारी ठेवून शेतक-यांच्या हिताचा कारभार करण्याचे वचन प्रवेशद्वारावरच राहिले आणि अध्यक्ष निवडीपासून गटबाजीला प्रारंभ झाला. अध्यक्ष म्हणून डॉ. शहापूरकर यांची निवड झाली.

शेतक-यांना चांगला दर देण्यासाठी डॉ. शारदचंद्र शहापूरकर यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आणि पूर्वी कधी दिला नव्हता एवढा ४०५ रूपये उच्चांगी दर दिला. वैद्यकिय क्षेत्रातील डॉ. शहापूरकर यांनी आपल्या अभ्यासू वृत्तीने आणि कुशाग्र बुद्धीने साखर उद्योगातील माहिती घेतली आणि कारखाना सर्वच बाबतीत अग्रेसर ठेवण्यासाठी त्यांनी अखेरपर्यंत धडपड केली.

हे एकीकडे चालू असतानाच गटबाजीने सारे संचालक मंडळ पोखरून काढले. त्यांचे जवळचे सहकारी विरोधी गटाला मिळाले. गटबाजीच्या राजकारणाने डॉ. शहापूरकर यांना सतावून सोडले. राजकारणी नसलेल्या डॉ. शहापूरकर यांना हा ताण सहन झाला नाही. संचालक मंडळाची बैठक चालू असतानाच आपले जवळचे सहकारी आपल्या विरोधात आहेत याचा मानसिक धक्का त्यांना सहन झाला नाही आणि याच अवस्थेत बैठक सुरू असतानाच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि कारखाना बैठकीतच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. सन १९८८ च्या कारखान्यातील सत्तांतरानंतर कारखान्यात आलेले अभ्यासू, आगळे-वेगळे व्यक्तिमत्त्व असलेले डॉ. शरदचंद्र शहापूरकर अशाप्रकारे गटबाजीच्या राजकारणात बळी गेले हीच गोष्ट मोठी धक्कादायक होती. ९८

## आमदार श्रीपतराव शिंदे यांची साखर कारखाना अध्यक्षपदी निवड

ऑक्टोबर, १९८८ च्या गडहिंग्लज साखर कारखाना निवडणुकीत सत्तांतर घडले. संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे यांच्या पॅनलचा पराभव करून शेतकरी पॅनल सत्तेवर आले. अडीच वर्षांनंतर कारखान्यात खांदेपालट झाला. काँग्रेस (आय) पक्षाकडील सत्तासूत्रे घेण्यात जनता दल यशस्वी ठरले. आमदार श्रीपतराव शिंदे २२ ऑक्टोबर, १९९० रोजी गडहिंग्लज साखर कारखान्याचे अध्यक्ष झाले. सत्तांतरापेक्षाही या खांदेपालटाला वेगळा अर्थ, वेगळे महत्त्व होते. कारखान्याची सूत्रे जनता दलाकडे आल्यामुळे तालुक्याचे संपूर्ण राजकीय चित्र पालटणार होते. तोंडावर आलेल्या जिल्हा बँक, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर-पालिका या निवडणूकावर दूरगामी परिणाम होणार होता. कारखान्याच्या निवडणुकीत सभासदांनी जाणीवपूर्वक सत्तांतर घडविले. आप्पासाहेब

नलवडे यांच्या एकतंत्री कारभाराला कंटाळलेल्या सभासदांना पर्याय हवा होता. शेतकरी पॅनलच्या रूपाने पर्याय समोर आल्याने सत्तांतर घडले. सत्तांतर घडविताना सभासदांच्या फार मोठया अपेक्षा होत्या. सुरवातीच्या दोन अडीच वर्षांत त्या कितपत फलद्रुप झाल्या हा प्रश्न होता. साखर कारखान्यात गटबाजीने उच्छाद मांडला होता. सत्तास्पर्धा जोरात होती हे चित्र एका बाजूला होते, तरी डॉ. शारदचंद्र शहापूरकर यांनी कारखान्याचा कारभार उत्तम त-हेने केला. तथापि सत्तारूढ गटाकडील तीन संचालक विरोधी गटास मिळाले आणि कारखाना अध्यक्ष डॉ. शहापूरकर अल्पमतात आले.

जून, १९९० मध्ये संचालक मंडळाच्या बैठकीच्यावेळीच डॉ.शहापूरकर यांचे निधन झाले. नव्या अध्यक्षांच्या निवडीच्यावेळी वेगळे काही घडविण्याचा आणि जनता दलाकडे सत्ता जाऊ नये, म्हणून कॉंग्रेस(आय) च्या नेत्यांनी सर्व मार्गांनी प्रयत्न करून पाहिला. पण त्यांचा उपयोग झाला नाही. आमदार श्रीपतराव शिंदे यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली. विधानसभा निवडणुकीत आमदार श्रीपतराव शिंदे यांनी कॉंग्रेस (आय) च्या एका गटाची मदत घेऊन सलग दुस-यावेळी विजय मिळविला. त्या पाठोपाठ साखर कारखाना सत्तेवरून कॉंग्रेस (आय) ला बाजूला सारण्यात ते यशस्वी ठरले. या घडामोडी तालुक्याच्या राजकारणाला कलाटणी देणा-या होत्या.

गटबाजीने पोखरलेल्या तालुका कॉंग्रेस (आय) पक्षाला साखर कारखान्यातील अध्यक्ष निवडीमध्ये पराभव म्हणजे मोठा धक्का होता. जनता दल आणि हत्तरकी गट अशी युतीच काही काळतरी राहणार होती. कॉंग्रेस (आय) पक्षाला सर्व सत्तास्थानातून हुसकावून लावण्यासाठी

ही युती आता अधिक जोमाने आत्मविश्वासाने कार्यरत होणार होती. साखर कारखान्यातील बदलाचा मोठा धक्का कॉंग्रेस (आय) पक्षाला बसला होता. गटबाजीने आणि विधानसभेच्या निवडणुकीतील पराभवाने पिचलेल्या कॉंग्रेस (आय) पक्षात थोडे चैतन्य येत होते. तोच कारखान्यातील मोठा धक्का बसला. या घटनेमुळे विरोधी पक्षाचा आत्मविश्वास मात्र वाढलेला होता. १९

गडहिंग्लज साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी आमदार श्रीपतराव शिंदे यांची निवड झाल्यानंतर तेथील परिस्थिती सुधारली. या निवडीपूर्वी साखर कारखाना गटबाजीच्या राजकारणाने सतत गाजत होता. आप्पासाहेब नलवडे यांना सत्तेवरुन घालवून कारखान्याची सूत्रे शेतकरी पॅनलच्या हाती देण्यात आपण चूक केली, अशी भावना शेतकरी सभासदांत बळावत चालली होती. घटनाच तशा घडत राहिल्या. तथापि ही गटबाजी संपुष्टात आली आणि आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याचे राजकारण स्थिरस्थावर झाले. कारखान्यासमोर अनेक प्रश्न होते. साखर कारखान्यासारखी संस्था संपूर्ण तालुक्याच्या विकासाचा केंद्रबिंदू ठरली पाहिजे. या संस्थेच्या माध्यमातून अनेक विकासकामे हाती घेता येणे शक्य आहे. ऊस उत्पादनवाढीचा प्रश्न, पाणीप्रश्न असे महत्वाचे प्रश्न होते. त्यासाठी नियोजनबध्द प्रयत्नांची गरज होती. आमदार श्रीपतराव शिंदे यांनी त्या दिशेने प्रयत्न चालविले होते.

कारखाना चालविणे, ऊस गाळून साखर पाडणे एवढेच मर्यादित काम करणे त्यांना मंजूर नाही. शेतकरी सभासदांच्या विकासाबरोबरच तालुक्याचे महत्वाचे प्रश्न सोडविण्याबाबत कारखान्याने पुढाकार घेतला पाहिजे असा दृष्टिकोन ठेवून आमदार शिंदे यांनी विविध योजना हाती

घेतल्या होत्या. ऊस विकासासाठी सुधारित बियाणांचा वापर करण्यासाठी कारखान्याच्या पुढाकाराने बियाणांचा पुरवठा सुरू केला. पाण्याचा वापर योग्य व्हावा म्हणून ठिबक संच बसविण्यासाठी कारखान्याने अनुदान देऊ केले. अशा विविध उपाययोजनांची कार्यवाही सुरू केली. साखर कारखाना कुणाची मक्तेदारी नाही. संचालक मंडळ, सभासद, शेतकरी, कर्मचारी ही सारी मंडळी एकाच कुटुंबातील आहेत, ही भावना ठेवूनच या कारखान्याचा कारभार हाकण्याची घोषणा आमदार शिंदे यांनी केली. शेतक-यांना चांगला भाव, कर्मचा-यांना चांगले वेतन या गोष्टी झाल्या पाहिजेत, शिवाय पाणीप्रश्न, रस्तेविकास, ऊस उत्पादनवाढ याबाबतही कारखान्याचा पुढाकार हवा. यासाठी कारखाना प्रयत्नशील आहे. वाळव्याचा किसन अहिर साखर कारखाना आमचा आदर्श आहे. त्या दिशेनेच वाटचाल करण्याचे आम्ही ठरविले आहे. या प्रयत्नास सर्वांचा जाणीवपूर्वक सहभाग हवा आहे. असे आमदार शिंदे यांचे मत होते. संचालक मंडळातील गटबाजी आणि इतर कटू घटना विसरून शेतकरी सभासदांना निवडणूक काळात दिलेल्या वचनाप्रमाणे शेतक-यांच्या हिताचा कारभार करण्यासाठी सर्व संचालकांनी प्रयत्न करावेत यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. उत्तम प्रशासन, काटकसरीचा कारभार आणि सभासदांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य या सूत्रानुसार कारभार करण्याचा संकल्प त्यांनी सोडला. कारखान्यातील गटबाजीचा गदारोळ संपला आणि कारखान्याचा कारभार मार्गी लागल्याने शेतकरी सभासदातून समाधान व्यक्त झाले.[२०]

## साखर कारखान्याचे राजकारण - सन १९९० ते १९९३

गडहिंग्लज साखर कारखान्याने सन १९९१ च्या गळित हंगामात साखर उतारा, कार्यक्षमता, उसाचे गाळप याबाबत काही नवे विक्रम प्रस्थापित केले.

चांगला दर देण्याचीही घोषणाही कारखान्याचे अध्यक्ष आमदार श्रीपतराव शिंदे यांनी केली, हे चित्र एकीकडे होते, तर दुसऱ्या बाजूला ऊस उत्पादक कृती समितीने साखर कारखान्याच्या कार्यपध्दतीविरूध्द आंदोलनाची भूमिका घेऊन जवळ जवळ तीन महिने मोर्चा, उपोषण, सत्याग्रह याद्वारे आंदोलन सुरू केले होते. शेवटच्या टप्प्यात सात दिवस धरणे धरून कृती समितीच्या कार्यकर्त्यांनी अटक करून घेतली. साखर कारखाना उत्तम चालल्याचे अध्यक्षांचे निवेदन आणि कृती समितीचे आंदोलन या परस्परविरोधी भूमिकांनी ऊस उत्पादकात मात्र गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस प्राधान्याने घ्यावा, साखर उताऱ्यानुसार दर द्यावा, कोणत्याही ठेवी कापून घेऊ नयेत, ऊसतोडणीचे वेळापत्रक तयार करावे, तोडणी वाहतुकीतील भ्रष्टाचार थांबवून शेतकऱ्यांची अडवणूक संपवावी या प्रमुख मागण्या कृती समितीने मांडल्या होत्या. प्रा. विठ्ठल बन्ने, शिवयोगी मोळदी, शामराव देसाई, अण्णा शिंदे या प्रमुख कार्यकर्त्यांनी कृती समितीचे नेतृत्व केले होते.

गडहिंग्लज साखर कारखान्याची आमदार श्रीपतराव शिंदे यांनी अध्यक्ष म्हणून सूत्रे घेतल्यापासून त्यांना हुसकावण्याचा एक कलमी कार्यक्रम विरोधी कॉंग्रेस (आय) च्या गटाने घेतला होता. खरे तर कॉंग्रेस (आय) मधील गटबाजीच्या राजकारणातूनच आमदार शिंदे यांच्याकडे कारखान्याचे अध्यक्षपद आले. ज्या संचालकांनी आमदार शिंदे यांना अध्यक्षपदी विराजमान केले तीच मंडळी विरोधी छावणीत राहून अध्यक्षपदावरून काढण्याचा प्रयत्न करीत होती. या सत्तास्पर्धेतून सहकार, कामगार, मुंबई न्यायालय अशा ठिकाणी विविध प्रकारचे पंचवीसपेक्षा जास्त खटले दाखल

झाले होते. साम-दाम-दंड-भेद या नीतीचा अवलंब करून संचालक फोडण्याचा प्रयोग सुरु झाला होता. गटबाजी, सत्तास्पर्धा यांनी उच्छाद मांडला असतानाही कारखाना मात्र उत्तम रीतीने चालला होता. गाळप, उतारा, कार्यक्षमता, उत्पन्न, नफा याबाबतचे नवे उच्चांक स्थापन झाले. कारखाना उत्तम चालवून दाखविला हे नाकारता येत नाही. ऑक्टोबर, १९८८ साली माजी अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे यांना बाजूस सारण्यासाठी ज्येष्ठ नेते बाबा कुपेकर, आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या पुढाकारानेच प्रबळ पॅनल उभा राहून सत्तांतर झाले. राजकारणाचे जोडे बाहेर ठेवून कारखान्याचा कारभार शेतकरी हिताचा केला जाईल, याचा विसर पहिल्याच बैठकीत साऱ्यांना पडला आणि आमदार श्रीपतराव शिंदे गटाला डावलून कॉंग्रेसच्या मंडळींनी अध्यक्ष-उपाध्यक्षांची निवड केली. तिथूनच या सत्तास्पर्धेच्या खेळाचा प्रारंभ झाला. कॉंग्रेसचा बालेकिल्ला म्हणून गडहिंग्लजचे नाव कॉंग्रेसच्या गटबाजीनेच इतिहास जमा केले. तरीपण एकेकाळी कॉंग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या तालुक्यातील साखर कारखाना विरोधी पक्षाकडे होता हीच सल कॉंग्रेसच्या नेत्यांना बोचत होती. कारखाना उत्तम स्थितीत चालला होता. नवनवे विक्रम झाले होते. आमदार श्रीपतराव शिंदे यांचे आसन बळकट होत होते. यामुळे कॉंग्रेसची मंडळी अधिकच बेचैन झाली होती. कारखान्यातील नोकरभरती, खरेदी, नवीन सभासद करणे याबाबत विरोधी गटाकडून गैरप्रकारचे आरोप सुरु झाले. परंतु यापूर्वीचा कॉंग्रेसच्या मंडळींचा कारभार चांगला होता असे सभासद मानायला तयार नव्हते. दोन्ही बाजूंनी निवडणूकपूर्व काळातील शेतकरी सभासदांना दिलेल्या आश्वासनांची आठवण करावी. राजकारणाची क्षेत्रे खूप आहेत. साखर कारखान्याचा कारभार एकत्रितपणे येऊन सहविचाराने करण्याचा प्रयत्न करावा. सत्तास्पर्धा, न्यायालयीन सर्व अशाप्रकारे वेळ आणि पैसा यांचा चुराडा होतो. गटबाजी, सत्तास्पर्धा यांना पूर्णविराम यावा, कारखान्याचा, तालुक्याचा विकास साधावा अशी सभासदांची इच्छा होती.

## गडहिंग्लज साखर कारखाना विकास कार्य - सन १९९० ते १९९३

गडहिंग्लज साखर कारखान्याने सन १९९० ते १९९३ या काळात आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नेत्रदीपक प्रगती असंख्य अडचणींना तोंड देत केली. सन १९८८ मध्ये साखर कारखान्यात सत्तांतर घडून आले. सत्तांतर करणाऱ्यांनाच एकाकी पाडण्याचे प्रयत्न करण्यात आले. ज्यांनी क्रांती केली त्यांनाच डावलण्यात आले. नेतृत्वाची ही कसोटीच होती. सन १९९० साली कारखान्याला सुयोग्य नेतृत्व लाभले. तालुक्याचे आमदार आणि १९८८ मधील कारखाना निवडणुकीचे कुशल संघटक श्रीपतराव शिंदे कारखान्याचे चेअरमन झाले. सन १९९० ते १९९३ या काळात आमदार व कारखाना अध्यक्ष श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विविध विकासकार्ये अंमलात आणली. ती खालीलप्रमाणे --

### १) ऊस विकास

कारखान्याचे गाळप क्षमतेनुसार आवश्यक असणाऱ्या उसाचे उत्पादन कारखान्याच्या कार्यक्षेत्रात उपलब्ध व्हावे यासाठी ऊस विकास योजना राबविण्यासाठी कारखान्याने केंद्र सरकारकडे योजना पाठविली. केंद्र सरकारने ६५.३७ लाखाचे कर्ज मंजूर केले आणि त्याची अंमलबजावणी सुरु केली. पथदर्शक ठिबक सिंचन योजना, लवकर पक्व होणाऱ्या ऊस जातीचे बेणे वाटप, उष्ण बाष्प हवा प्रक्रिया यंत्र, त्रिस्तरीय बेणे मळे, वाहन सुविधा योजनेवर सदर रक्कम खर्च करण्यात येणार होती. या योजनेमुळे कार्यक्षेत्रात अंदाजे ६५००० मे. टन ऊस उत्पादन वाढ अपेक्षित होते. ऊस बियाणाबरोबरच सभासदांना पाणीपुरवठा योजनेसाठी केंद्र शासनाकडील योजना मंजूर झाली होती. या योजनेअंतर्गत २९९.१४ लाख रुपये मंजुरी

मिळाली. या योजनेखाली नवीन विहिरी खुदाई, जुन्या विहिरी खुदाई के.टी. वेअर, लिफ्ट इरिगेशन असे प्रकल्प राबविण्यात येणार होते. या योजनेमुळे पुढील फायदे होणार होते.

१) सध्याचे ऊस क्षेत्राशिवाय ८३१ हेक्टर जादा क्षेत्र ऊस पिकाखाली येऊन ९३,४०० मे. टन ऊस उपलब्ध होणार होते व त्यामुळे ऊस वाहतूक खर्चात प्रतिवर्षी रु. १८.६८ लाखाची बचत होणार होती.

२) साखरेच्या उता-यामध्ये ०.१२ टक्के वाढ होणार होती.

३) के.टी. वेअरमुळे ऊस वाहतूक खर्चामध्ये प्रतिवर्षी ८.६८ लाखाची बचत होणार होती.

४) संपूर्ण गळीत हंगाम संपेपर्यंत पाणी पुरवठा होणार होता.

२) भाग विकास निधी - समाजहितासाठी वापर

सभासदांच्या बिलातून उभा केलेला भाग विकास निधीतून भाग विकासाचे विविध प्रकल्प राबविण्यात आले. त्यामध्ये शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार विविध शैक्षणिक संस्थाना मदत, पैलवानांना मदत, बालवाडी चालविणे, ओढयावर पूल बांधणे, पाणंद दुरूस्त करणे, जळीतग्रस्तांना मदत, मजुरांच्या आकस्मिक आपत्तीच्यावेळी मदत, गंभीर आजारी रूग्णाला (कॅन्सर, ह्दयरोग) उपचारांसाठी मदत, तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना साहाय्य, परदेशी कृषी अभ्यासासाठी जाणा-यांना साहाय्य या प्रकारे सभासदांचा पैसा सभासदांच्या विभागाच्या साहाय्य या प्रकारे सभासदांचा पैसा सभासदांच्या विभागाच्या विकासासाठी खर्च करण्यात आला.

३) मागासवर्गीयांना सभासदत्वासाठी अनुदान

साखर कारखाना कार्यक्षेत्रातील मागासवर्गीय छोटया शेतक-यांनाही कारखान्याचे सभासद होता यावे यासाठी अनुदान तत्वावर मदत करुन ३३० मागासवर्गीयांना कारखान्याचे सदस्य करण्यात आले. याशिवाय मागासवर्गीय अनुदान योजनेतून ऊस उद्योग शेती विकसित करण्यासाठी अल्पभूधारक मागासवर्गीय २३३ शेतक-यांना १ लाख ८३ हजार रुपये रक्कम वाटप करण्यात आले.

४) प्रदूषणमुक्त कारखाना

साखर कारखान्यातून बाहेर पडणा-या सांडपाण्याचा नदीच्या पाण्यावर तसेच शेतक-यांच्या जमिनीवर परिणाम होऊ नये म्हणून अनेक योजना कारखान्याने राबविल्या. मोठया प्रमाणावर निलगिरी, नारळ, चिक्कू, आंबा आदी झाडांची लागवड करण्यात आली. तसेच शेतक-यांनाही माफक दरात कारखाना नर्सरीतून रोपे पुरविली.

५) कंपोस्ट खत उत्पादन

मळी व सांडपाण्यावर झाडे लावली. तसेच प्रेसमड व सांडपाण्यावर कंपोस्ट खत निर्माण करण्याची योजना कारखान्याने राबविल्यामुळे शेतक-यांना किफायतशीर भावात उत्तम खत मिळू लागले. हे वाढत्या भावाच्या रासायनिक खताला चांगला पर्याय आहे. वृक्षारोपण आणि खत उत्पादन यामुळे कारखान्याचे उत्पन्न वाढण्याची अपेक्षा असून प्रदूषणाचा धोकाही कमी झाला आहे.

६) पाणी अडवा पाणी जिरवा

गडहिंग्लज भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. पाण्याच्या प्रश्नासाठी आमदार व कारखाना अध्यक्ष श्रीपतराव शिंदे वारंवार लढा दिला आहे. कारखान्याने पाणीप्रश्नी बंडिंग, छोटे तलाव, प्रवाही बंधारे, ओढ्यावर बंधारे यावर सुमारे ३९ लाख रूपयांवर खर्च केला आहे. अत्यंत काटकसरीने केल्या जाणाऱ्या योजनांमुळे २९० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येत आहे आणि ऊसाचे उत्पादन ८००० मे. टनाने वाढण्याची अपेक्षा आहे. ऊसाशिवाय इतर पिके आणि पिण्यासाठीही या पाण्याचा वापर होणार आहे.

७) शेती अवजारांची सुविधा

कारखान्याने टॅक्टर आणि अन्य शेती उपयुक्त अवजारे खरेदी करून सवलतीच्या दराने सभासदांच्या शेती कामासाठी उपलब्ध केली आहेत. त्यामुळे जमीन सपाटीकरण करणे, खोडवा काढणे, खोडवा नांगरट करणे, ढेकळे फोडणे, सरी करणे ही कामे सभासदांना अल्पखर्चात करून घेणे शक्य झाले आहे.

८) शेतकऱ्यांना मार्गदर्शन

शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी ऊस विकास खात्याकडून मार्गदर्शन केले जाते. शेतकऱ्यांच्या सहली, मेळावे, मार्गदर्शनपर व्याख्याने, प्रात्यक्षिके यामुळे शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर पडून पर्यायाने कारखान्याच्या उत्पादनवाढीस चालना मिळते.

९) कामगार कल्याण

साखर कारखान्यास ऊस पुरवठा करणारा सदस्य हा जसा केंद्रबिंदू आहे, तसेच कामगार हा कणा आहे. कामगारांच्या हितासाठी अनेक योजना व्यवस्थापनाने राबविल्या आहेत. कामगार अपघात विमा योजना सुरू केली. कामगाराकरिता विश्रांतीगृह, भोजनगृह बांधण्यात आले आहे. तसेच अकाली मयत कामगारांच्या मुलांना नोकरी देण्याचेही धोरण कारखान्याने राबविले आहे. तातडीच्या वैद्यकिय सेवेसाठी रुग्णवाहिका, स्कूल बस, पाण्यासाठी वॉटर कूलर्स, सुसज्ज वाचनालय, कामगारांना टी.व्ही. सेट, स्कूटर, मोटरसायकल इ. खरेदीसाठी सोयी आदी अनेक सुविधा कामगारांना उपलब्ध करून दिल्या आहेत.

१०) मोफत सामुदायिक विवाह

कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद, कामगार आणि भागातील गरीब जनतेच्या हितासाठी मोफत सामुदायिक विवाह योजना कारखान्यामार्फत राबविण्यात आली.

वरीलप्रमाणे साखर कारखान्याच्या माध्यमातून गडहिंग्लज कारखान्याचा कारभार लोकाभिमुख करण्याचा चेअरमन आमदार श्रीपतराव शिंदे यांनी आटोकाट प्रयत्न केला आहे. शेतकरी सभासदांना देशात सर्वात जास्त दर देण्याचा उच्चांक या कारखान्याने प्रस्थापित केला आहे. शेतकरी सभासदांना त्यांच्या उसाला चांगला भाव देणे, सभासदांना पेन्शन योजना, सुधारित ऊस जाती देऊन अधिक उत्पादन वाढविणे, सभासदांच्या हिताच्या अनेक योजनांना गती देणे, पाणीपुरवठा योजना, रस्ते दुरुस्ती, पाझर तलाव, भूकंप निधी, विहिरी सुधार योजना, बायोगॅस योजना, वनविकास

प्रकल्प, दवाखाना इ. विविध कारखाना माध्यमातून राबविल्या आहेत. [२१] नॅशनल प्रॉडक्टीव्हिटी कौन्सिल, नवी दिल्ली या संस्थेच्यावतीने अखिल भारतीय पातळीवर घेण्यात आलेल्या स्पर्धेत गडहिंग्लज तांत्रिक कार्यक्षमतेचे दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले. सन १९९० ते १९९३ अखेर शैक्षणिक व क्रीडा संस्थांना मदत, रुग्णांना मदत, आपद्ग्रस्तांना (जळीत, दुष्काळ, भूकंप, पूर इ.) मदत, शेतकऱ्यांना मदत, पैलवान विकास निधी, किसान संमेलन, लोकन्यायालय इ. विविध गोष्टीसाठी जवळजवळ सहा लाख रुपयांपर्यंत मदत देण्यात आलेली आहे. [२२]

कारखाना अध्यक्ष आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या कारकिर्दीची वैशिष्टये

१) सन १९९१-९२ साली ऊस उत्पादकांना ५२५ रु. एवढा महाराष्ट्रात विक्रमी दर दिला, तसाच कामगारांनाही ३० टक्के व अधिक ६ दिवसाचा पगार एवढा विक्रमी बोनस दिला.

२) सन १९९२-९३ साली ऊस उत्पादकांना ७२७.५० रु. प्रति टन इतका देशात सर्वात जास्त दर दिला. तसेच कामगारांना ३२ टक्के इतका विक्रमी बोनस दिला.

३) ज्या सभासदांच्या ठेवीची मुदत संपली आहे, अशा सुमारे १ कोटी १५ लाखाच्या ठेवी १५ टक्के व्याजाने परत करणारा महाराष्ट्रातील पहिला साखर कारखाना.

४) साखर कारखाना २००० मे. टन प्रतिदिन इतक्या क्षमतेचा असताना दररोज २६५० मे. टन प्रतिदिन गाळप करून एक विक्रम प्रस्थापित केला.

५) जमीन मशागतीसाठी ट्रॅक्टर अवजारासह सवलतीच्या दरात भाडयाने उपलब्ध.

६) विहिरीतील गाळ काढणे, विहीर खुदाईचा माल बाहेर काढणे यासाठी अल्पखर्चात स्वयंचलित अत्याधुनिक द्वारका क्रेन्स (या-या) उपलब्ध.

७) कमीत कमी खते वापरून व पाण्याचा काटकसरीने वापर करून चांगल्या प्रतीच्या जादा उसाचे उत्पादन वाढीसाठी ऊस पथदर्शक योजना कार्यान्वित.

८) लिफ्ट इरिगेशन योजना, नवीन विहीर खुदाई तसेच जुन्या विहीर खुदाईसाठी केंद्र शासनाच्या साखर विकास फंडातून अर्थसहाय्य मंजूर.

९) गडहिंग्लज तालुक्यात निरनिराळया १८ ठिकाणी नाल्यावर बंधारे बांधणेची कामे सुरु केली.

१०) गडहिंग्लज तालुक्यातील खराब झालेले निरनिराळया २३ ठिकाणच्या रस्त्यांची दुरुस्ती.

११) ओढयावर पूल बांधणे, पाणंद रस्ते दुरुस्त करणे इत्यादीसाठी अर्थसहाय्य.

१२) पणोचवंडी बंधा-यासाठी कारखान्याचा सहभाग.

१३) शाळा इमारत बांधकामासाठी आर्थिक मदत.

१४) पैलवानांना मानधन

१५) जळीतग्रस्तांना आर्थिक साहाय्य.

१६) कॅन्सर, हृदयरोग यासारख्या रुग्णांना वैद्यकिय मदत.

१७) क्रीडा मंडळांना क्रीडा साहित्यासाठी अर्थसहाय्य.

१८) कामगार, सेवक व शेतकरी यांना पिण्याच्या थंड पाण्यासाठी कूलरची सुविधा.

१९) कामगार व सेवक यांना गेटसेल कोटयातून प्रति किलो रु. ६/- या दराने दरमहा पुरेशी साखर पुरवठा.

२०) परदेशातील कृषि विषयक अभ्यास दौऱ्यासाठी आर्थिक साहाय्य.

२१) लोकन्यायालये, कुटुंबनियोजन इ. शिबिरासाठी अर्थसाहाय्य.

२२) मागासवर्गीयांना शिक्षणासाठी मदत, बालवाडीसाठी आर्थिक साहाय्य.

२३) तोडणी मजुरांना दुखापत, अपघाती निधन इ. साठी अर्थसाहाय्य.

२४) कारखान्यामार्फत मोफत सामुदायिक विवाह.[२३]

वरील विविध योजना आमदार श्रीपतराव शिंदे यांनी कारखाना अध्यक्ष म्हणून आपल्या कारकिर्दीत राबविल्या. साखर कारखाना माध्यमातून आमदार व साखर कारखाना अध्यक्ष या दोन्ही माध्यमामधून गडहिंग्लज तालुक्याचा विकास साधण्याचा प्रयत्न केला. कारखान्याचे कार्यक्षेत्रातील जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले. सहकारी चळवळीच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडवून आणले. साखर कारखाना केवळ ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा नाही, तर संपूर्ण तालुक्यातील जनतेचा आहे. विकासाचा केंद्रबिंदू आहे. या सत्तास्थानाच्या माध्यमातून तालुक्यातील शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, बेरोजगाराच्या बेकारीचा प्रश्न, अल्पभूधारक शेतकऱ्याच्या शेतीचा विकास, तालुक्याच्या औद्योगिकरणाला चालना, साखर कारखाना पर्यटन स्थळ व्हावे यासाठी कार्य केले.

## गडहिंग्लज साखर कारखाना निवडणूक - सन १९९३

सन १९८८ नंतर गडहिंग्लज सहकारी साखर कारखान्याची निवडणूक नोव्हेंबर, १९९३ साली जाहीर झाली. जनता दल, काँग्रेस (आय) मधील कुपेकर गट, हत्तरकी गट, नलवडे तसेच काही स्वतंत्र उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले. गडहिंग्लज साखर कारखाना निवडणूक अर्ज माघारीची तारीख टळल्यानंतर स्पष्ट झालेले चित्र मोठे गोंधळात टाकणारे होते. राजकारणात काही घडू शकते हे सिध्द करणारे चित्र होते. गडहिंग्लज तालुक्याच्या नेतृत्वाच्या स्पर्धेतील आमदार श्रीपतराव शिंदे, ज्येष्ठ नेते बाबा कुपेकर आणि राजकुमार हत्तरकी हे तीन प्रमुख नेते साखर कारखाना निवडणूक रिंगणात परस्पराविरुध्द शड्डू ठोकून मैदानात उतरले होते. निवडणूकीपूर्वी दोन आठवडे तालुका काँग्रेसमधील विविध गटांना एकत्र आणण्याचे जोरदार प्रयत्न झाले. या ऐक्य प्रकरणानेच तालुक्याच्या राजकारणात गोंधळाचे आणि संशयाचे चित्र निर्माण केले. उद्योगपती महादेवराव महाडिक, पालकमंत्री सदाशिवराव मंडलिक यांनी ऐक्यासाठी सक्रीय भूमिका बजावूनही यश मिळाले नाही. प्रारंभी साखर कारखान्याचे संस्थापक आप्पासाहेब नलवडे यांनी काही अटी घालून अलवणूकीची भूमिका घेतली होती. त्यामुळे ऐक्य होणार नाही, झाले तर नलवडे-हत्तरकी ऐक्य होईल अशी सर्वांची अपेक्षा होती. मात्र शेवटच्या क्षणी नलवडे-कुपेकर हे दोन गट एकत्र आले. दहा दहा जागा वाटून घेतल्या आणि हत्तरकी गटाला अलग पाडले.

हे चित्र स्पष्ट झाल्यानंतर जनता दलाचे आमदार श्रीपतराव शिंदे यांचा सत्तारूढ गट आणि हत्तरकी गट यांच्यातील ऐक्याचे नाट्य सुरु झाले. गेल्या चार-पाच वर्षात हे दोन गट एकत्रित होते, यावेळी मात्र

समझोता होऊ शकला नाही. अर्ज माघारीची वेळ येईपर्यंत हे प्रयत्न सुरू होते. आमदार शिंदे यांनी कॉंग्रेसच्या गटबाजीवर लक्ष ठेवीतच आपल्या पॅनलची रचना पूर्ण केली होती. एखादा गट आला, तर चार-पाच जागा सोडण्याची त्यांची तयारी होती. मात्र ही तडजोड न जमल्याने त्यांनी आपले स्वतंत्र पॅनल केले. हत्तरकी गटापुढे मात्र विचित्र प्रसंग उभा राहिला. त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न आला. प्रमुख दोन्ही पॅनलनी या गटाला डावलल्याने स्वतंत्र पॅनल करण्याशिवाय त्यांच्यापुढे पर्याय नव्हता. कुठल्यातरी पॅनलमध्ये आपले स्थान नक्की आहे याच भ्रमात हा गट होता. त्यामुळे थोडा गाफिलपणा झाला. एक गोष्ट मात्र शहाणपणाची ठरली, की उमेदवारी अर्ज भरून ठेवले होते. त्यामुळे पॅनलची रचना करताना उमेदवार कमी पडले नाहीत किंवा अपक्षांची मदत घ्यावी लागली नाही. अर्ज माघारीसाठी प्रांत कचेरीच्या आवारात जमलेल्या उमेदवारांतून पॅनलची रचना करण्याचा प्रसंग या गटावर आला. परंतु अशा ऐनवेळीसुद्धा मोठया धैर्याने पॅनलची रचना करण्यात आली. त्यामुळे दुरंगी लढतीचे चित्र मागे पडले. तीन प्रमुख पॅनलशिवाय अनेक उमेदवार निवडणूक रिंगणात होते. नलवडे-कुपेकर यांच्या पॅनलच्या रचनेत स्थान न मिळाल्याने काही नाराज मंडळींनी आपली उमेदवारी कायम ठेवली होती.

तडजोडीचे प्रयत्न सुरु असतानाच बाबा कुपेकर यांनी राजर्षि शाहू पॅनलची घोषणा करून संपूर्ण २० जागा लढविण्याची तयारी चालविली होती. त्याप्रमाणे कानडेवाडीत मेळावा घेऊन उमेदवारांची निश्चिती सुरु होती. त्यामुळे अनेकांना उमेदवारी मिळणार ही आशा होती. नलवडे गटाशी ऐनवेळी तडजोड झाल्यामुळे दहा जणांना स्थान मिळाले, दहा जणांना माघार घ्यावी लागली. त्यात खुद्द कुपेकर यांच्या पत्नी सौ. संध्यादेवी, बाबूराव मदकरी, शिवाजी खोत, ईश्वर गोरले अशी काही प्रमुख मंडळी

होती. त्यातील शिवाजी खोत, बाबूराव मदकरी यांनी आपले अर्ज कायम ठेवले. संस्थापक-अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे यांनी आपल्या उमेदवारात नवीन चेह-यांना स्थान दिले होते. मात्र त्यांचे चिरंजीव संग्रामसिंह नलवडे, बंधू दत्ताजीराव नलवडे यांना स्थान मिळाले नाही. कुपेकरांच्या मागे कार्यकर्त्यांचा मोठा संच होता, तर संस्थापक नलवडे यांना मानणारा सभासदवर्ग होता. या दोघांच्या युतीने पॅनल वजनदार झाल्याचे म्हटले जात असले, तरी कॉंग्रेसच्याच हत्तरकी गटाला समावून घेतले असते, तर हे पॅनल अधिक भक्कम झाले असते, असे म्हटले जात होते. सत्तारूढ अध्यक्ष श्रीपतराव शिंदे यांच्या पॅनलची रचना चांगली होती. विद्यमान नऊ संचालकांना पुन्हा संधी देण्यात आली होती. तीन वर्षांचा कारभार, शेतक-यांना चांगला दर, ऊस विकास योजनेची कार्यवाही, पाणंदीचे रस्ते, जलसिंचन योजना, युवकांना नोकरीत स्थान अशा धडक कार्यवाहीने एक वेगळे वातावरण तयार करण्यात आमदार श्रीपतराव शिंदे यांना यश मिळाले असले तरी एवढ्या भांडवलावर विजय खेचून आणणे ही अवघड गोष्ट होती. गेल्या चार-पाच वर्षांत कॉंग्रेसच्या हत्तरकी गटाशी दोस्ती होती ती कायम टिकवून आघाडी झाली असती, तर विजयाचा मार्ग सोपा झाला असता. सुरवातीचे चित्र पाहिले तर हत्तरकी गटाला एकाकी पाडल्याचे समाधान दोन्ही पॅनलना पश्चाताप करायला लावणारे होते. हत्तरकी पॅनल निर्णायक मते घेऊन निवडणूक निकालावर निश्चित परिणाम घडवून शकणारे होते. गेल्या वेळी निवडणूकीत संस्थापक-अध्यक्ष नलवडे यांच्या विरूद्ध कॉंग्रेसचे सर्व गट आणि जनता दलाचे आमदार श्रीपतराव शिंदे यांनी शेतकरी पॅनल उभारून कारखान्यात सत्तांतर घडविले होते. यावेळी मात्र परिस्थिती गोंधळाची होती. तालुक्याच्या राजकारणाची दिशा बदलणारी, तालुक्याच्या नेतृत्वाचा निर्णय देणारी ही निवडणूक होती. तसेच कॉंग्रेस पक्ष आणि जनता दल यांच्या भवितव्याशी निगडीत म्हणून या निवडणुकीला वेगळे महत्त्व होते. [२४]

पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्राला कलाटणी देणारी निवडणूक

आमदार श्रीपतराव शिंदे यांचे शेतकरी पॅनल व संस्थापक चेअरमन आप्पासाहेब नलवडे - बाबा कुपेकर यांचे राजर्षि शाहू पॅनल तर राजकुमार हत्तरकी यांचे सहकार पॅनल अशी तिरंगी लढत झाली. या निवडणुकीत पोस्टर्स व कटआऊटस् उभी करण्यात तिन्ही पॅनलनी बाजी मारली असून या पॅनलनी करावयाच्या कामांचा आराखडा मतदारांच्या मनावर ठसविण्या-चा प्रयत्न पोस्टर्सद्वारे केले होते. या कारखान्याच्या निवडणुकीचे मतदान १९ नोव्हेंबरला होत असून जनता दल आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली असलेला पश्चिम महाराष्ट्रातील हा एकमेव कारखाना सत्तांतर घडवून कॉंग्रेस नेत्यांच्या ताब्यात घेण्यासाठी दिग्गज नेत्यांनी प्रयत्न केले असून अल्पशा विजयाने हा कारखाना मतदार कोणाच्या ताब्यात देणार ? याकडे कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार क्षेत्राबरोबरच साखर सम्राटांचे लक्ष लागले होते.

या निवडणुकीच्या २० जागेसाठी ९० उमेदवार रिंगणात उतरले होते. या तीन पॅनलशिवाय विजयकुमार मोडेकर आणि विद्यमान संचालक ॲड. अर्जुनराव रेडेकर हे दोघे वगळता इतर स्वतंत्र उमेदवार हे नगण्य होते. चेअरमन श्रीपतराव शिंदे यांनी कारखान्याच्या माध्यमातून विविध विकास योजना राबविल्या असून कार्यक्षेत्रातील बंधारे, रस्ते, शैक्षणिक संस्थांना आर्थिक मदत, दलित दुर्बल, कष्टकरी वर्गातील दिर्घ आजाराने पछाडलेल्या रुग्णांना अर्थसहाय्य, शेतकऱ्यांच्या मुदत संपलेल्या ठेवींची परतफेड, ठेवून व्याजदरात वाढ, ऊसाला उच्चांकी दर, ४२९ तरुणांना नोकरीची संधी, २८८८ व्यक्ती व ३७ सहकारी सोसायटीना नव्याने सभासदत्व या जमेच्या बाजू असून स्वकर्तृत्वावर ते मतदारांच्या पुढे आले होते. शेतकरी पॅनलच्या

प्रचारासाठी वाळव्याच्या किसन अहिर कारखान्याचे संस्थापक नागनाथ आण्णा नाईकवडी यांनी मतदार संघात अनेक सभा घेऊन मतदार बंधूना शेतकरी पॅनल निवडून देण्याचे आवाहन केले. तर संस्थापक माजी चेअरमन श्री. आप्पासाहेब नलवडे यांनी हा कारखाना अपार कष्टातून उभा केला आहे. विस्तारीकरण, अल्कोहोल प्रकल्प राबवून काटकसरी प्रवृत्तीमुळे कारखाना पाच वर्षांत कर्जमुक्त केला. श्री. आप्पासाहेब नलवडे व श्री. बाबासाहेब कुपेकर या दोघांना एकत्र आणण्यात सहकार महर्षी दत्ताजीराव कदम सूतगिरणीचे चेअरमन प्रा. किसनराव कुऱ्हाडे यांचा महत्वाचा वाटा होता. तर राजकुमार हत्तरकी यांनी सहकार पॅनेल उभे केले होते. या पॅनलमार्फत विद्यमान उपाध्यक्ष अॅड. हणमंतराव पाटील हे निवडणुकीत उतरले होते. संपूर्ण मतदार संघात प्रचारदौरा रात्रंदिवस करण्यात आला. कोल्हापूर जिल्ह्याचे संपर्कमंत्री व शिक्षण-पाटबंधारे राज्यमंत्री नामदार सदाशिवराव मंडलिक, जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष शंकरराव पाटील-कौलवकर व खासदार उदयसिंग गायकवाड हे प्रचार सभा घेऊन श्री. नलवडे व श्री. कुपेकर यांच्या कुशल प्रशासक कॉंग्रेसप्रणीत शाहू आघाडीला बिघर भ्रष्टाचारी, शेतकऱ्यांचे हित पहाणारे असे नेतृत्व शाहू आघाडीला मिळाले असून या आघाडीला प्रचंड मतांनी निवडून देण्याचे आवाहन केले.

जिल्हा बँक, जिल्हा दूध संघ, विरशैव बँक आणि जिल्हा परिषद या माध्यमातून उत्कृष्ट प्रशासक म्हणून उल्लेखनीय कामगिरी विविध पदावर करून नावलौकिक मिळविलेले श्री. हत्तरकी या नेत्याने सहकार पॅनल उभे करून आमदार शिंदे व नलवडे-कुपेकर गटापुढे आव्हान उभे ठाकले होते. हत्तरकींना कॉंग्रेस व जनता दलाकडे सत्तेत समान भागिदारी नाही म्हणून या बाबीवरून अखेरच्या क्षणी त्यांनी आपली ताकद अजमावण्यासाठी स्वयंभू पॅनल करण्याचा निर्णय घेतला. हत्तरगी यांच्या सहकार पॅनलला माजी आमदार कै.डॉ. शिवलिंग शिवयोगी घाळी यांच्या पत्नी श्रीमती रत्नमाला घाळी, पंचायत

समितीच्या सभापती श्रीमती माधुरीदेवी देसाई, माजी आमदार बी.एस्. पाटील यांनी पाठिंबा दिला होता. तर राजर्षि शाहू आघाडीच्या प्रचारासाठी तालुका काँग्रेस (आय) अध्यक्ष बी.एन्. पाटील मुगळीकर, प्रा. किसनराव कुऱ्हाडे, प्रा. विठ्ठल बन्ने, विश्वनाथ आलूरकर, तालुका संघाचे अध्यक्ष ॲड. विश्वनाथ पाटील, कुक्कुटपालन संस्थेचे अध्यक्ष बाजीराव होडगे यानी प्रचारसभा घेतल्या होत्या.

विद्यमान चेअरमन आमदार श्रीपतराव शिंदे यांचे प्रचाराकरिता विद्यमान ९ संचालक, ३ माजी नगराध्यक्ष, जनता दलाचे कार्यकर्ते, पंचायत उपसभापती विनोद नाईकवाडी, प्रा. सुधाकरराव गोकाककर व अविनाश आलुरकर यांनी प्रयत्न केले. विशेष म्हणजे ही निवडणूक तालुक्यातील काँग्रेस (आय) व जनता दल या दोन राजकीय पक्षांच्या अस्तित्वाची लढाई होती. या निवडणुकीत सहकार पॅनलला भाजपाने व शिवसेनेने शेतकरी पॅनलला पाठिंबा दिला होता. या निवडणुकीत ६६९२ व्यक्ती मतदार व ३१ सहकारी संस्था मतदान करणार होत्या. एका मतदाराला १९ मते देण्याचा अधिकार होता. या निवडणुकीकडे जिल्ह्याचेच नव्हे तर पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्राबरोबरच साखर सम्राटांचे या निवडणूक निकालाकडे लक्ष होते.[२५]

## सन १९९३ च्या निवडणुकीत गडहिंग्लज साखर कारखान्यात सत्तांतर : राजर्षि शाहू पॅनलचा विजय

संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधून घेतलेल्या गडहिंग्लज सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत शेतकरी पॅनलचा दारुण पराभव झाला. काँग्रेसप्रणित राजर्षि शाहू पॅनलच्या हाती सत्ता सोपविण्याचा निर्णय

मतदारांनी घेऊन सन १९८८ नंतर दुसऱ्यांदा सत्तांतर घडविले. शाहू पॅनलचे १९ उमेदवार विजयी झाले, तर विद्यमान अध्यक्ष श्रीपतराव शिंदे यांना निसटता विजय मिळाला. सहकार पॅनलचा एकही उमेदवार विजयी झाला नाही. निवडणूक निकाल विश्लेषण खालीलप्रमाणे

गडहिंग्लज साखर कारखाना निवडणूक – सन १९९३ निकाल तक्ता

तालिका

एकूण मतदार – ६,६९२ संस्था मतदान – ३१

| अ.नं. | विजयी उमेदवाराचे नांव | गट | पॅनलचे नांव | मिळालेली मते |
|---|---|---|---|---|
| १) | श्री.डॉ.प्रकाश श्रीपाद शहापूरकर | गट नं.१ | राजर्षि शाहू | २,५२४ |
| २) | " संतराम बाळू पाटील | –"– | –"– | २,३९३ |
| ३) | " बचाराम कृष्णा मोहिते | –"– | –"– | २,३४२ |
| ४) | " आप्पासाहेब नलवडे | गट नं.२ | –"– | २,५०५ |
| ५) | " रामगोंड पाटील | –"– | –"– | २,४२९ |
| ६) | " धोंडीराम कदम | –"– | –"– | २,३९७ |
| ७) | " प्रकाश चव्हाण | गट नं.३ | –"– | २,४९० |
| ८) | " आप्पासाहेब पाटील | –"– | –"– | २,४५३ |
| ९) | " सुभाष शिरकोळे | –"– | –"– | २,४३६ |
| १०) | " तानाजीराव मोकाशी | गट नं.४ | –"– | २,४७१ |
| ११) | " शामराव शिंदे | –"– | –"– | २,३८८ |
| १२) | " आम.श्रीपतराव शिंदे | –"– | शेतकरी पॅनल | २,३५६ |
| १३) | " रणजितसिंह महागावकर | गट नं.५ | शाहू पॅनल | २,५५५ |
| १४) | " अरुण हरळीकर | –"– | –"– | २,४०६ |
| १५) | " अजितसिंह नेसरीकर | –"– | –"– | २,३८७ |
| १६) | सौ. क्रांती कुऱ्हाडे | महिला राखीव | –"– | २,५२६ |
| १७) | श्रीमती विजयमाला रणनवरे | –"– | –"– | २,३२४ |
| १८) | श्री. लक्ष्मण कांबळे | मागासवर्गीय गट | –"– | २,३९० |
| १९) | " सुरेश बटकडली | दुर्बल गट | –"– | २,०२४ |
| २०) | " विलास बागी | संस्था गट | –"– | २० |

सन १९८८ मध्ये झालेल्या निवडणुकीत संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे यांना ज्या मतदारांनी झिडकारले होते त्याच मतदारांनी त्यांच्या नेतृत्वाखालील पॅनलला भरघोस मतांनी विजयी करून सन्मानाने कारखान्याची सूत्रे सोपविली. कारखान्याच्या निवडणूक रिंगणात तीन मातब्बर पॅनल होती. त्यामुळे निवडणुकीत कमालीची चुरस निर्माण झाली होती. कॉंग्रेसच्या गटांनी एकत्र येऊन बाबा कुपेकर यांच्या नेतृत्वाने राजर्षि शाहू पॅनल केले होते. मात्र हत्तरकी गटाशी तडजोड झाली नाही. विद्यमान अध्यक्ष श्रीपतराव शिंदे यांनीही कॉंग्रेसच्या गटाची मदत न घेता स्वतंत्र शेतकरी पॅनल म्हणून लढत दिली. अत्यंत अटीतटीने झालेल्या निवडणुकीत तिन्ही पॅनलकडून प्रचंड यंत्रणा उभी केली होती. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्याचेच नव्हे, तर राज्यातील सहकार क्षेत्राचे या निवडणूकीकडे लक्ष लागून राहिले होते.

यावेळी प्रथमच मोठ्या प्रमाणावर मतदारांना एकत्र करून थेट मतदान केंद्रावर एकत्र आणण्यात आले होते. या निवडणुकीत तीन पॅनलशिवाय अपक्ष उमेदवारांची संख्याही मोठी होती. त्यामुळे निवडणुकीचे चित्र कमालीचे गोंधळाचे बनले होते. अंदाज बांधणे कठीण होते. मतदारांनी मात्र बाबा कुपेकर आणि संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे यांच्या राजर्षि शाहू पॅनलच्या बाजूने निःसंदिग्ध कौल दिला. आणि साखर कारखान्याची सूत्रे कॉंग्रेस पक्षाकडे देण्याचा निर्णय घेतला. तालुक्याच्या भविष्यकालीन राजकारणाला कलाटणी देणारा हा निर्णय होता.[२६]

## राजर्षि शाहू आघाडीच्या विजयाची कारणे

गडहिंग्लज साखर कारखाना निवडणुकीत मतदारांनी सत्तांतर घडविले. कारखान्यातील सत्तांतर तालुक्याच्या राजकारणाला कलाटणी देणारे

होते. साखर कारखाना निवडणुकीच्या निमित्ताने झालेल्या नेतृत्वाच्या लढाईत कॉंग्रेस (आय) नेत्यांनी बाजी मारली. तालुक्याची आमदारकी, साखर कारखाना आणि नगरपालिका ही सत्तास्थाने कॉंग्रेस (आय) मधील गटबाजीतून विरोधी पक्षाकडे गेली होती. सन १९९१ च्या नगर पालिका निवडणुकीत पालिकेची सत्ता शाहू पॅनलने घेतली. त्यापाठोपाठ साखर कारखान्यातही विजय मिळविला. ज्येष्ठ नेते बाबा कुपेकर आणि साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे यांच्या नेतृत्वाखाली राजर्षि शाहू पॅनलची रचना करण्यात आली होती. कॉंग्रेस (आय) मधील बहुतेक सर्व गट एकत्र आले. हत्तरकी गट मात्र बाजूस राहिला. त्यांनी स्वतंत्रपणे आपले अस्तित्व ठेवले होते, राजर्षि शाहू पॅनलच्या विजयाची कारणमीमांसा पुढीलप्रमाणे -

१) सन १९८८ आणि १९९३ या पाच वर्षात दोन वेळा साखर कारखान्यात घडलेले सत्तांतर थोडे धक्कादायक वाटत असले, तरी तालुक्याच्या राजकारणातील विचित्र परिस्थितीतून हे घडलेले आहे. श्री. आप्पासाहेब नलवडे यांच्या एकतंत्री कारभारातून निर्माण झालेला असंतोष होता. कॉंग्रेस (आय) मधील विविध गट आणि जनता दल यांनी एकत्र येऊन शेतकरी पॅनलला पर्याय दिला आणि सन १९८८ मध्ये सत्तांतर घडले. हे सत्तांतर मोठया कौतुकाचा विषय ठरले होते. मात्र पाच वर्षांचा कारभार पाहिला, तर गटबाजीने मांडलेल्या उच्छादाने शेतकरी सभासदांना उबग आणला होता. गटबाजीतून जनता दलाचे आमदार श्रीपतराव शिंदे यांनी अध्यक्षपद पटकावले. तीन वर्षे त्यांनी साखर कारखाना माध्यमातून चांगले बस्तान बसविले होते. वेगळी प्रतिमा तयार केली होती. या पार्श्वभूमीवर त्यांनी कॉंग्रेसच्या आधाराशिवाय स्वतंत्र पॅनल करण्याचा निर्णय घेतला. एकाकी झुंज देऊन त्यांनी दोन हजारापर्यंत मते घेतली. दुसऱ्या स्थानावर त्यांचे पॅनल राहिले.

२) सन १९८८ मध्ये आणि १९९३ मध्ये दोन्ही निवडणुकीत सत्तांतर घडविण्यात श्री. बाबा कुपेकर यांचे प्रयत्न कारणीभूत ठरले. दोन्ही वेळच्या सत्तांतराचे तेच शिल्पकार म्हटले जातात. श्री. नलवडे यांच्यावर जुन्या सभासदांचे प्रेम होते. ही प्रेमाची शिदोरी आणि कुपेकर गटातील कार्यकर्त्यांचा मोहोळ यामुळेच राजर्षि शाहू पॅनलला यावेळी विजयश्री खेचून आणता आली.

३) सत्तारुढ शेतकरी पॅनलचे आमदार श्रीपतराव शिंदे यांनी एकाकी लढत देण्याचे धाडस का केले, या प्रश्नाचे नेमके उत्तर असे होते की, तालुक्याच्या राजकारणात काँग्रेस (आय) च्या कुबडया घेऊन कारभार करण्यात अनेक अडथळे येतात, गटबाजीतच सारा वेळ जातो. त्याऐवजी स्वबळावर पॅनल करुन विजय मिळाला, तर अधिक चांगले काम करता येईल हा त्यांचा सरळ हिशोब होता.

४) तालुक्याच्या राजकारणात कुपेकर-नलवडे प्रथमच एकत्र आले होते. त्यांचे सख्य कसे राहाणार, इत्तरकी गटाची भविष्यकालीन कोणती भूमिका राहणार हे प्रश्न निर्माण झाले होते. मात्र तालुक्यातील ग्रामीण कार्यकर्त्यांचा सूर लक्षात घेतला, तर सर्व गटांनी एकत्र येऊनच तालुक्यास नेतृत्व द्यावे. या दबावातूनच शाहू पॅनलची निर्मिती झाली होती. कुपेकर-नलवडे गटाबरोबरच सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते प्रा. किसन कु-हाडे यांचा गटही शाहू आघाडीत सामील झाला होता. प्रा. कु-हाडे यांनी काँग्रेस (आय) मधील गटांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न केले. त्याचा परिणाम निवडणूक निकालावर झाला.

५) काँग्रेस (आय) अंतर्गत गटबाजीतून सत्तास्थाने विरोधकांकडे गेली ही सल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना नेहमी खुपत होती. विरोधकांकडील सत्तास्थाने

खेचण्यासाठी कॉंग्रेस (आय) अंतर्गत गटातील मंडळी एकत्र आली आणि विजयश्री खेचून आणण्यात यश मिळविले.

६) जनता दलाने जसे स्वतंत्र पॅनल करुन निवडणूक लढविली तसाच प्रसंग हत्तरकी गटावर आला. दोन्ही पॅनलकडे तडजोड न झाल्याने गटाचे अस्तित्व टिकविण्यासाठी या गटाला निवडणूक लढाईत भाग घ्यावा लागला, तरीही या पॅनलने प्रचाराची मोठी धडक मारुन आपले अस्तित्व दाखवून दिले व बाराशे मते मिळविली. जयपराजयापेक्षा या गटाची सर्वांनाच दखल घ्यावी लागली. आमदार श्रीपतराव शिंदे - हत्तरकी गटाचे दोन स्वतंत्र पॅनल झाले. या फुटीचा फायदा नलवडे-कुपेकर गटाला मिळाला. [२७]

## शाहू आघाडीच्या विजयाचे परिणाम

गडहिंग्लज साखर कारखान्यातील सत्तांतराने आता तालुक्याच्या राजकारणाची नवी मांडणी सुरु झाली. तालुक्याच्या राजकारणाची दिशा बदलणारी निवडणूक होती. सन १९९१ च्या नगरपालिका निवडणुकीत कॉंग्रेस (आय) ने सत्तांतर घडवून विरोधी जनता दलाची नगरपालिकेतील सत्ता संपुष्टात आणली. कॉंग्रेसमधील सर्व गट एकत्र आले तर विरोधकांचा पराभव करु शकतो याची जाणीव कॉंग्रेस(आय) पक्षाच्या कार्यकर्त्यांना झाली. त्याचीच पुनरावृत्ती १९९३ च्या साखर कारखाना निवडणुकीत झाली. हत्तरकी गट वगळता कॉंग्रेस (आय) पक्षातील सर्व गट एकत्र आले. त्याचा परिणाम सत्तांतर घडवून आणण्यात झाला. विरोधी जनता दलाकडील सत्ता प्राप्त करण्यात कॉंग्रेसला

यश मिळाले. पालिका निवडणुकीपाठोपाठ कारखाना निवडणुकीत सत्ता प्राप्त करून विरोधी पक्षाकडील सत्ता हस्तगत करण्यात दुसऱ्यांदा काँग्रेस (आय) ला यश मिळाले.

गटबाजीच्या राजकारणाचा कौशल्याने उपयोग करून श्रीपतराव शिंदे यांनी आमदारकी, नगरपालिका व साखर कारखाना ही सत्तास्थाने प्राप्त केली होती. परंतु या यशाच्या चढत्या कमानीला साखर कारखाना निवडणुकीपासूनच ओहोटी लागली. त्याचाच परिणाम म्हणजे सन १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस (आय) चे बाबासाहेब कुपेकर यांना यश मिळाले. आमदारकी, नगरपालिका व साखर कारखाना ही सत्तास्थाने काँग्रेसला प्राप्त झाली. तालुक्याच्या राजकारणावर काँग्रेस (आय) पक्षाने पुन्हा आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

## गडहिंग्लज साखर कारखाना राजकारण - इ.स. १९९३ ते १९९५

गडहिंग्लज तालुक्याचा चेहरामोहरा बदलण्याच्या अभिवचनावर सन १९९३ मध्ये झालेल्या साखर कारखाना निवडणुकीत सत्तांतर घडविण्यात संस्थापक चेअरमन यांनी आमदार बाबा कुपेकर यांच्या सहकार्याने यश मिळविले. संघटना बांधणी कौशल्य दाखविणारे आमदार कुपेकर संघटना टिकविण्यात कायम यशस्वी होत आहेत, हे गडहिंग्लज नगरपालिकेच्या व साखर कारखान्याच्या सत्तासंघर्षावरून स्पष्ट झाले. गडहिंग्लज साखर कारखान्यात असणारी आमदार श्रीपतराव शिंदे यांची सत्ता संपुष्टात आणण्यासाठी काँग्रेस अंतर्गत विविध गटनायकांनी तत्वच्युती युतीला मान्यता देऊन कारखान्याच्या राजकारणात चेअरमन आप्पासाहेब नलवडे यांचे नेतृत्व मान्य करावयाचा

निर्णय घेतला. बाबा कुपेकर, विलास बागी, प्रा. किसनराव कुराडे यांनी नलवडे यांच्याशी युती जमविली. श्री. श्रीपतराव शिंदे हटाव मोहिमेत नोव्हेंबर, १९९३ च्या निवडणुकीत यश मिळविले. पण परस्पर हाडवैरी असलेल्या गटनायकात दोन महिन्यात संघर्षाला सुरवात झाली. आणि कुपेकर, बागी, कुराडे यांनी नलवडे हटाव मोहिम राबविण्याचा पवित्रा घेतला. [२८] सन १९९३ च्या निवडणुकीत निर्विवाद बहुमत मिळविल्यानंतर ४ डिसेंबर, १९९३ रोजी चेअरमनपदी श्री. आप्पासाहेब नलवडे यांची तर व्हाईस चेअरमनपदी विलासराव बागी यांची निवड झाली. त्यानंतर काही महिन्यातच मार्च, १९९४ मध्ये घेण्यात आलेल्या बैठकीत तज्ज्ञ संचालक कोण ? हा वादाचा मुद्दा होऊन सत्तारूढ नलवडे-कुपेकर अशी फूट पडली. त्यानंतर सत्तारूढ गटातच सत्तास्पर्धा सुरू झाली. तज्ज्ञ संचालक, कामगार संचालक, सह्यांचे अधिकार, कार्यकारी संचालकाचे निलंबन आदि कारणामुळे साखर कारखाना राजकारण सतत धुमसत राहिले. [२९]

गडहिंग्लज साखर कारखाना सत्तास्पर्धेत खुर्चीचा हव्यास ठेवून दोन्ही गटाकडून शहाला काटशहाचे राजकारण सुरू झाले. कारखान्याच्या संचालक मंडळात महिला संचालिका म्हणून सौ. क्रांती कुराडे निवडून आल्या होत्या. ज्या गटातून उमेदवारी मिळाली त्यांच्या विरोधात पवित्रा स्वीकारल्याने सौ. क्रांती कुराडे यांनी संचालक मंडळातून हकालपट्टीसाठी श्री. नलवडे गटाने जोरदार प्रयत्न चालविले. या सर्व प्रकरणाचे म्होरके म्हणून आमदार बाबा कुपेकर यांचे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे गडहिंग्लज साखर कारखान्यावरील प्रतिनिधीत्व कमी करण्यात नलवडे गटाला यश मिळाले. श्री. नलवडे गटाला शह देण्यासाठी श्री. नलवडे यांचे समर्थक लक्ष्मण कांबळे व शामराव शिंदे यांच्या विरूद्ध अधिकाराचा गैरवापर करून बँकींग व्यवहारातील गोपनियतेला बगल देऊन प्रा. कुराडे यांनी एका सभासदाच्या नावे थकबाकीची कागदपत्रे पुरविली

आणि दोघांवरील अपात्रतेची टांगती तलवार कायम ठेवण्याची बाजी मारली. या काटशहाला उत्तर म्हणून कुन्हाडेंचे समर्थक व दुर्बल घटक संचालक सुरेश बटकडली यांना अपात्र ठरविण्यात नलवडे गटांनी प्रयत्न सुरु केले.

अशा परिस्थितीच्या राजकारणावर मात करण्याचा आटापिटा बागी गटाने चालविला. कार्यकारी संचालक श्री. ए.ए. कापरे यांना हाताशी धरुन कारखान्याची सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न बागी गटाने चालविला. या गटाच्या पथ्यावर विधानसभेवर बाबा कुपेकरांची निवड असली तरी माजी मुख्यमंत्री शरद पवार यांचेच आसन डळमळीत झाल्यामुळे कुपेकरांची आमदारकी जास्त प्रभाव टाकणारी नाही.[30]

साखर कारखान्यातील ४२९ कामगारांचा प्रश्न

गडहिंग्लज साखर कारखान्यातील सत्तांतरानंतर कारखान्यातील ४२९ कामगार आणि २८८८ नवीन सभासदांचा प्रश्न निर्माण झाला. आमदार श्रीपतराव शिंदे चेअरमन असताना भरण्यात आलेल्या ४२९ कामगारांना चेअरमन नलवडे यांनी कमी केल्यामुळे कामगारांची पुरती ससे होलपट सुरु झाली. गटबाजीचा फायदा घेऊन सत्ता मिळवून आमदार शिंदे यांनी कारकीर्द गाजविली. त्यांनी आपल्या हातात सत्ता असताना कारखान्यात कामगारांची आवश्यकता असल्याचे ठरवून सभासदांच्या मुलांना भरती करण्याचे ठरवून ४२९ युवकांना संधी देण्यात आली. ३१ डिसेंबर, १९९१ च्या ठराव मंजूर करुन ३१ जानेवारी, १९९२ ला आदेश काढून त्यांना कामावर घेण्यात आले. या नोकरभरती विरुध्द तत्कालीन संचालक बी.टी. पाटील यांनी

न्यायालयात धाव घेतली. तेव्हापासून आजअखेर हा प्रश्न न्यायालयाच्या चक्रात सापडला आहे. कुपेकर-नलवडे गटाने सत्ता मिळविली. त्यानंतर चेअरमन पदाची सूत्रे आप्पासाहेब नलवडे यांनी घेतल्यावर ४२९ कामगारांना आपण कामगार मानत नाही असे सांगून पगार थांबविला. लेखी न देता त्यांना घरी पाठविले.

कामगारांना कमी केल्यावर सर्वाधिक कामगार भरल्याचा आरोप असणारे बी.टी. पाटील यांनी १० ते १७ जानेवारी, ९४ अखेर आमरण उपोषण केले. उपोषणवेळी अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनामुळे कामगारांना हायसे वाटले. मात्र आश्वासनाची पूर्तता करण्यात "लाल फितीवाले" यशस्वी झाले नाहीत. याच काळात तानाजी झळे या कामगाराने आत्महत्या केली. त्याच्या चौकशीसाठी मोर्चा निघाला. उपोषण, मोर्चे, घेराव, आत्म-हत्या आणि त्यापलिकडेही आत्मदहनाचा इशारा एवढयाचे फलित शून्यच झाले. आमदार श्रीपतराव शिंदे यांनी"४२९ कामगारांचा प्रश्न मी असेपर्यंत सोडविल्याशिवाय राहणार नाही" असे स्पष्ट केले. [३१]

४२९ कामगार हे अतिरिक्त असून त्यांमुळे कारखान्याला आणि पर्यायाने शेतकऱ्याला सुमारे १ कोटीचा फटका सहन करावा लागणार असल्याने त्यांना सेवेत घेणे शक्य नाही, अशी सत्तारूढ मंडळींनी भूमिका घेतली. नोव्हेंबर, १९९४ मध्ये ४२९ कामगारांच्या प्रश्नावर न्यायालयाचा निकाल लागला. महिन्याभरात त्यांना कामावर घ्यावे असे सांगण्यात आले. मात्र निकालातील त्रुटीवर बोट ठेवून सत्तारूढांचाच एक गट म्हणतो की, व्यवस्थापन समिती आणि स्थायी समिती यांनी बैठक घेऊन पुन्हा त्या कामगारांना आदेश घावेत. त्यामुळे कामगारांचा प्रश्न लोंबकळत राहिला. तसेच सभासदांचा प्रश्नही अनिर्णित आहे. कामगारांचा प्रश्न जनता दल व

शिवसेना यांनी उपोषण, गडहिंग्लज बंद, चेअरमन व संचालकांच्या घरावर मोर्चे, घेराव आदि आंदोलनांनी छेडण्यात आला. कामगारांना एका महिन्यात कामावर घ्यावे असा आदेश असतानाही त्याकडे दुर्लक्ष झाले आहे. नोकरी गमावलेल्या तरुणांना आर्थिक फटका बसला आहे. [३२]

गडहिंग्लज साखर कारखान्याचे संचालकात सत्तास्पर्धेसाठी तीव्र संघर्ष चालू असतांना कारखान्याचे संस्थापक व चेअरमन पी.आर. उर्फ आप्पासाहेब नलवडे यांनी आपल्या चेअरमनपदाचा राजीनामा प्रकृत्तीचे कारण पुढे करुन दिला. गडहिंग्लज साखर कारखाना उभारणीत महत्वाची भूमिका बजावून कारखाना मार्गी लावणारे आप्पासाहेब नलवडे १९८८ च्या निवडणुकीत पराभूत झाले. कॉंग्रेसमधील कुपेकर - हत्तरकी गट आणि जनता दलाचे आमदार श्रीपतराव शिंदे यांनी १९८८ साली एकत्र येऊन शेतकरी आघाडी स्थापन केली. त्यावेळी गटबाजीला उधाण येऊन आघाडी दुभंगली. डॉ. शरदचंद्र शहापूरकर यांचे त्याच कालावधीत निधन झाले आणि श्रीपतराव शिंदे यांनी या भांडणाचा फायदा घेऊन आपल्या ताब्यात चेअरमनपद राखले. सन १९९३ च्या साखर कारखाना निवडणुकीत राजकुमार हत्तरकी यांचे स्वतंत्र पॅनल झाल्याने श्रीपतराव शिंदे यांच्या शेतकरी पॅनलला पराभव पत्करावा लागला. तेव्हा एकत्र येवून विजयी झालेले आप्पासाहेब नलवडे यांची चेअरमनपदी निवड करण्यात आली. परंतु काही महिन्यातच चेअरमन व व्हाईस चेअरमन यांच्या समर्थकांत दोन गट पडले. याच काळात सौ. क्रांती कुराडे यांनी नलवडे गटाला रामराम ठोकला तर ज्येष्ठ संचालक रामगोंडा पाटील यांचे आकस्मित निधन झाले. त्यामुळे नलवडे गटाचे काठावरचे बहुमत घेवून प्रवास सुरु असताना गेल्या दिड वर्षात सहकार न्यायालयापासून उच्च न्यायालयापर्यंत सुमारे चार डझन खटले कारखाना वादासंदर्भात आहेत. आपल्या सहकाऱ्यांना अंधारात ठेवून श्री. नलवडे यांनी

९ जुलै, १९९५ रोजी राजीनामा दिला. [33] त्यांच्यानंतर डॉ. प्रकाश शहापूरकर यांची साखर कारखाना अध्यक्षपदी निवड झाली.

गडहिंग्लज सहकारी साखर कारखान्याचे राजकारण गडहिंग्लज तालुक्याच्या पक्षीय राजकारणामध्ये पूर्णपणे मिसळलेले होते. आणि तालुक्याच्या राजकारणात होणा-या बदलाचे प्रतिबिंब साखर कारखान्याच्या राजकारणात पडलेले आपणास दिसते. या राजकारणाला कॉंग्रेस पक्षांतर्गत चाललेल्या गटबाजीच्या राजकारणाचेही परिणाम होते. सुरवातीच्या काळात श्री. आप्पासाहेब नलवडे यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याची वाटचाल झाली. पण १९८८ नंतर कॉंग्रेसमधील दोन गट कुपेकर आणि हत्तरकी यांनी विरोधी आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या गटाशी हातमिळवणी केली. त्यामुळे त्यांच्या शेतकरी पॅनलचा विजय झाला. आमदार श्रीपतराव शिंदे अडीच वर्षे या कारखान्याचे अध्यक्ष होते. त्यांच्या कारकिर्दीत अनेक नव्या योजना त्यांनी रेटल्या. उसाला किफायतशीर भाव दिला पण १९९३ च्या निवडणुकीत हत्तरगी गट वेगळा झाला. आणि कुपेकर-नलवडे गट एकत्र झाले. या निवडणुकीत हत्तरकी गटाला १२०० पर्यंत मते मिळाली. या विभागणीमुळे श्रीपतराव शिंदे यांच्या शेतकरी आघाडीचा पराभव झाला आणि आप्पासाहेब नलवडे यांचा गट पुन्हा सत्तेवर आला. तालुक्याच्या राजकारणात हत्तरकी गटाचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. ज्या गटाशी या गटाची आघाडी होते तो गट जिंकतो किंवा ज्या गटाशी या गटाची फारकत होते तो गट हरतो, हे १९९५ च्या निवडणुकीने सिध्द झाले. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत गडहिंग्लज विधानसभा मतदार संघात हत्तरकी अपक्ष उमेदवार म्हणून उभे राहिले आणि त्यांच्या उमेदवारीमुळे दोनवेळा निवडून आलेल्या श्रीपतराव शिंदे यांचा पराभव झाला. विरोधी पक्षाच्या राजकीय पुढा-याला यश मिळविण्यासाठी आणि ते कायम टिकविण्यासाठी कॉंग्रेस अंतर्गत एखाद्या गटाचा पाठिंबा घ्यावाच लागतो हे यावरून सिध्द होते.

.....

## प्रकरण चौथे

## संदर्भसूची


१. चौसाळकर अशोक – "सहकार आणि महाराष्ट्राचे राजकारण", समाज प्रबोधन पत्रिका, पुणे, जुलै-सप्टेंबर, १९९२, पृष्ठ नं. ११६,११९.

२. खतीब के.ए. – भारताचा औद्योगिक भूगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रकाशन वर्ष, १९९५, पृष्ठ नं. ४१ ते ४३.

३. गडहिंग्लज तालुका सहकारी साखर कारखाना सन १९७८-७९ वार्षिक अहवाल, पृष्ठ नं. ७ ते ११.

४. गडहिंग्लज तालुका सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवालांच्यावरून.

५. दै.पुढारी, कोल्हापूर, दि. १८ एप्रिल, १९८१,
तत्रैव, २३ एप्रिल, १९८१.

६. गुरु गोपाळ – "महाराष्ट्रातील साखर कामगार चळवळ", समाज प्रबोधन पत्रिका, पुणे, जुलै-सप्टेंबर,१९९२, पृष्ठ नं. १२३.

७. दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. १० जून, १९८८.
साखर कारखाना नूतन वास्तुप्रवेश विशेष पुरवणी, चेअरमन आप्पासाहेब नलवडे यांची मुलाखत.

८. गडहिंग्लज तालुका सहकारी साखर कारखाना - वार्षिक अहवाल, सन १९८०-८१ ते १९८८-८९.

९. किर्लोस्कर (मासिक) - संपादक ह.मो. मराठे, फेब्रुवारी, १९९५, पृष्ठ नं. ११.

१०. जैन अशोक - महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, शेठ प्रकाशन, मुंबई, प्रकाशन वर्ष, जून,१९९३, पृष्ठ नं. ११९ ते २०१.

११. औटी विद्याधर - दि पॉलिटिक्स ऑफ डेव्हलपमेंट - शुगर को-ऑपरेटिव्ह इन रुरल महाराष्ट्र, डॉ. बी.एस्. बावीसकर यांच्या पुस्तकाचे परीक्षण, तात्पर्य, सप्टेंबर, १९८१. पृष्ठ नं. २१.

१२. दैनिक सकाळ, कोल्हापूर दि. १८ ऑक्टोबर, १९८८.

१३. तत्रैव - दि. २० ऑक्टोबर, १९८८

१४. दैनिक पुढारी, कोल्हापूर दि. २७ ऑक्टोबर, १९८८.

१५. दैनिक सकाळ, कोल्हापूर दि. २६ ऑक्टोबर, १९८८.

१६. तत्रैव, नोव्हेंबर, १९८८.

१७. तत्रैव, जानेवारी, ८९, ५ ऑक्टोबर, ८९.

१८. तत्रैव, १३ जून, १९९०.

१९. तत्रैव, २७ ऑक्टोबर, १९९०.

२०. तत्रैव, ७ जानेवारी, १९९१.

२१. गडहिंग्लज तालुका सहकारी साखर कारखाना - एक आढावा, प्रकाशक - शेतकरी पॅनल मित्रमंडळ, कोल्हापूर.

२२. दैनिक तरुण भारत, कोल्हापूर - आमदार श्रीपतराव शिंदे गौरव पुरवणी, दि. १५ मे, १९९३.

२३. गडहिंग्लज तालुका सहकारी साखर कारखाना - एक आढावा, पृष्ठ नं. १७, १८.

२४. दैनिक सकाळ, कोल्हापूर - दि. १९ नोव्हेंबर, १९९३.

२५. साप्ताहिक गडहिंग्लज सृष्टी - १८ नोव्हेंबर, १९९३.

२६. दैनिक सकाळ, कोल्हापूर - दि. २३ नोव्हेंबर, १९९३,

२७. तत्रैव, दि. २५ नोव्हेंबर, १९९३.

२८. साप्ताहिक गडहिंग्लज सृष्टी - दि. २२ ऑगस्ट, १९९४.

२९. दैनिक तरुण भारत, कोल्हापूर - दि. ११ जुलै, १९९५.

३०. साप्ताहिक गडहिंग्लज सृष्टी - दि. ३ एप्रिल, १९९५.

३१. दैनिक तरुण भारत, कोल्हापूर - दि. १९ डिसेंबर, १९९४.

३२. तत्रैव, दि. १७ एप्रिल, १९९५.

३३. दैनिक महासत्ता, इचलकरंजी - दि. १९ जुलै, १९९५.

३४. तत्रैव, दि. २९ ऑगस्ट, १९९५.


.....